दिवाळीचा मोठा अंक.

REGISTERED No. B. 3344

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ७ नोव्हेंबर, १९४५ अंक ४४

Telephone : 31084 two lines Telegram : "Sardargriha."

**SARDAR GRIHA**

**THE PREMIER & OLDEST HOTEL**

For High Class Hindus, Chiefs and Sardars. Rooms fitted with latest equipments, Bath, Lift etc.

CENTRALLY SITUATED

*Near CRAWFORD MARKET, BOMBAY 2.*

**न्यू इंडिया इंडस्ट्रिज, लि.**

२६, लॅमिंग्टन रोड ( नॉर्थ ), मुंबई ११

: अध्यक्ष :

श्री. माधव रामचंद्र जोशी, बी. ए., कागदाचे व्यापारी.

बँक ऑफ महाराष्ट्र लि., श्रीराम सिल्क मिल्स लि., लोकमान्य मिल्स लि., विजय टेक्स्टाइल्स लि., औंध म्युच्युअल लाइफ अॅशुअरन्स सोसायटी लि., वगैरे कंपन्यांचे डायरेक्टर.

: मॅनेजिंग एजंटस :

—मराठे आणि कंपनी—

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स् ★ छापखान्याचे रोलर्स ★ सर्व प्रकारचे रबरी वॉशर्स्

★ रबरी हातमोजे ★ रीमोल्ड टायर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार करतात.

शेअर्सवर भरपूर डिव्हिडंड : : ठेवी स्वीकारल्या जातात

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर

सांडू ब्रदर्स यांची अनुभवसिद्ध औषधें

सांडू-प्रेग-युटेरो — गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
सांडू-बाळंत काढा — नं.१ पहिले दहा दिवसांत घेणेंचा; नं.२ दहा दिवसानंतर घेणेंचा
सांडू-बाळ कडू — मूल उपजल्यापासून देण्यास योग्य
सांडू कुमारी आसव नं. ३ — मुलांचे यकृत (लिव्हर) विकारांवर व उत्कृष्ट टॉनिक
सांडू-टोमॅटो कम्पाउण्ड — भूक लागून अन्नपचनाकरितां व्हिटॅमिनयुक्त टॉनिक

V. BHUJBAL & Co.

ओरिजिनल ब्राह्मीतेलाचे एकटेच कारखानदार

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्युफॅक्चरिंग केमिस्ट अँन्ड ड्रगिस्ट, चेंबूर — मुंबई.

दि सदर्न निटिंग वर्क्स लि.

ह्यांनीं तयार केलेली

होजिअरी

★ सर्व प्रकारचा सुती, लोकरी आणि जाळीचा, निरनिराळ्या डिझाइन्समधील माल.

★

इंटरलॉक अंडरवेअर्स व शर्टस

★

एस. व्ही. सुपनेकर
कुलकर्णी अँड सन्स
मॅनेजिंग एजंटस

आतां आपली युद्धसमाप्तीमुळें नोकरी सुटणार

या काळजीनें

पुढें काय करावें हा प्रत्येक हंगामी नोकरापुढें

प्रश्न उभा रहाणार

यासाठीं स्वतंत्र धंदाच करणें किफायतशीर.

याकरतां

पुणें येथील सुप्रसिद्ध

कॉमनवेल्थ विमा कंपनी लिमिटेड

ची एजन्सी घेऊन तो प्रश्न सोडवा.


आजच लिहा अगर भेटा.

ल. ब. भोपटकर — अध्यक्ष
एस. एम. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

स्प्रिंग टाईप

" डुप्लीकेटर "

दर ताशीं ४०० प्रती प्रमाणें हजारों प्रती काढा !!




★ हँन्डलूम व पॉवरलूम करितां
★ टिकाऊ व सफाईदार
★ दर माफक —
माहिती करितां लिहा.

कारखानदार शेवडेज कॅमेरा वर्क्स लि. बेळगांव
(S.M.C. INDIA)

सर्व ऑफिसें, शाळा, कॉलेजें, बँका, विमाकंपन्या, कारखाने, म्युनिसिपालिट्या वगैरे

—सर्वच संस्थांना अत्यंत उपयुक्त—

किंमत रु. ८५–१२ फक्त. पॅकिंग, रेल्वे वगैरे खर्च निराळा.

आजच माहितिपत्रक मागवून ऑर्डर धाडवा.

कारखानदारः—

शेवडेज् कॅमेरा वर्क्स लि. बेळगांव S. M. C.

# विजय टेक्स्टाइल्स लि.

—पुणें ४—

- सदर कापड गिरणी चालू होऊन ४ वर्षें पूर्ण झालीं.
- दुसरे वर्षीं कंपनीनें प्रेफरन्स व ऑर्डिनरी शेअर्सवर सहा टक्के डिव्हिडंड दिलें.
- मध्यंतरीचे काळांत कच्च्या मालाची (सुताची) अडचण, महागाई, व खर्चाचें वाढलेलें प्रमाण ह्यामुळें डिव्हिडंड वाटलें नाहीं.
- आतां परिस्थिति बऱ्याच अंशीं सुधारली असून काम जोरांत चालूं आहे व तयार होणाऱ्या कापडास चांगली मागणी आहे.
- शेअरविक्री चालू आहे. तसेंच मुदतबंद ठेवीही घेतल्या जातात. शेअर्स व ठेवीबद्दल पत्रव्यवहार करावा.

—विजय टेक्स्टाइल्स लि., पुणें ४

हिज हायनेस श्रीमंत सरकार सांगलीचे राजेसाहेब यांच्या आश्रयाखालीं स्थापन झालेली

# दि सांगली बँक लि०

( स्थापना १९१६ )

बोर्ड ऑफ डिरेक्टर्स

( १ ) राव. ह. ब. कुलकर्णी
( २ ) शेठ ज. वि. करमरकर
( ३ ) शेठ ता. श्री. आरवाडे
( ४ ) ना. नि. प. कोरे

| | | |
|---|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,००,००० |
| रिझर्वस् | ... | रु. २,००,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ६०,००,००० |

हेड ऑफिसः—सांगली ( S. M. C. )

—शाखा—

१ शहापूर, २ शिरहट्टी, ३ तेरदळ, ४ रबकवी, ५ कवठे, ६ मंगळवेढें, ७ तुपारी ( ताकारी M. S. M. Rly. ) ८ उगार ( M. S. M. Rly. ), ९ विलिंग्डन कॉलेज ( जि. सातारा )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**P.S.MOKASHI**
मॅनेजर.

## आपली दीपावलि आनंदाची जावो

# पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि.,

निरनिराळ्या तऱ्हेचे पुठ्ठे, कागदी पेट्या, पाकिटें, फाइल्स, लेबलें,
कॅलेन्डर्स इत्यादि अनेक प्रकारच्या कागदी मालाचे
एकमेव महाराष्ट्रीय कारखानदार

८१४ सदाशिव, पुणें २.



# रूरल प्रॉडक्टस कं.
# लिमिटेड

## ची मागील वर्षांतील प्रशंसनीय प्रगति

(१) स्वतःचे मालकीच्या पिकांच्या लागवडीसाठी जमिनीची खरेदी.
(२) टिकेकर रेल्वे स्टेशनास लागून ४ एकर जमिनीची खरेदी.
(३) मालविक्रीची स्वतंत्र योजना.
(४) यामुळें वाढलेल्या व्यापासाठीं सुमारें ५०,००० रुपये जमा करण्याचा नवीन उपक्रम.

*माहिती मागविण्याचा पत्ताः—*

म्यानेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्टस कं. लि.,
९५१ सदाशिव, पुणें २.

वर्ष ११ वें अर्थ अंक ४४ वा
बुधवार, ता. ७ नोव्हेंबर १९४५

# ★ नैसर्गिक साधनें आणि लोकसंख्या ह्यांची विषम वाटणी ★

## मागसलेल्या देशांचें दारिद्र्य कसें दूर करणार ?

आज जगांत सर्वत्र राजकीय व आर्थिक स्वरूपाचे दुहेरी झगडे चालू असल्याचा विलक्षण देखावा दिसून येत आहे. युद्धसमाप्तीनंतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय- पुनर्घटनेच्या प्रश्नांची चर्चा होऊन त्यांच्या समाधानकारक निकालाचें स्वरूप युद्ध चालू असतांनाच निश्चित झालें होतें. आंतरराष्ट्रीय मतभेदाचा निर्णय तडजोडीनें करावयाचा आणि प्रत्येक राष्ट्रास आर्थिक सुस्थितीचा योग्य वाटा मिळेल अशी व्यवस्था घडवून आणावयाची असें प्रमुख व प्रबल राष्ट्रांनीं ठरवलें होतें. दारिद्र्याची जगांतून हकालपट्टी होऊन जागतिक संपत्तीचा वाटा प्रत्येक लहान-मोठ्या राष्ट्रास मिळण्याच्या मार्गातील अडथळे दूर केले जाण्याचें अभिवचन प्रसिद्ध "अटलांटिक सनदे" मध्यें नमूद केलेलें आहे. पण हीं उच्च ध्येयें आणि अभिवचनें ह्यांस मूर्त स्वरूप देण्याचा प्रसंग येतांच आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय एकवाक्यतेच्या ऐवजीं सर्वत्र बजबजपुरी माजून राहिली असल्याचें दिसत आहे. युरोपांत राजकीय व आर्थिक सत्तेच्या विभागणीचे बाबतींत रशिया आणि पाश्चात्य राष्ट्रें ह्यांमध्यें तीव्र मतभेद उत्पन्न झाले आहेत, आफ्रिका व एशिया ह्या खंडांत स्वातंत्र्याबाबत झगडे होत आहेत आणि पाश्चात्य साम्राज्यशाहीचा निषेध केला जात आहे. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत कारखान्यांतील मजुरांचे मोठे संप ह्याच वेळीं चालले आहेत.

अत्यंत विध्वंसक असें युद्ध संपून नवीन मनु नीट चालू होईपर्यंतच्या काळांत अस्वस्थता, असंतोष, विविध हित-कलह कमीअधिक प्रमाणांत बोकाळणें अपरिहार्य आहे. पण ह्या गोंधळांतून जगास बाहेर काढून त्यांत स्थिर शांतता व स्वास्थ्य स्थापण्यासाठीं इंग्लंड, अमेरिका व रशिया हीं प्रमुख राष्ट्रें स्वतः गंभीरपणानें उच्चारलेलीं ध्येयें कृतींत कशीं उतरवणार हा येथें खरा प्रश्न आहे. जगांतील मागसलेल्या व दरिद्री देशांतील लोकांची रहाणी सुधारण्याकरितां नैसर्गिक व मनुष्यकृत संपत्तीची योग्य वाटणी सर्वत्र केली जाणें अत्यंत आवश्यक आहे आणि आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय आर्थिक व राजकीय धोरणें ह्या वाटणीस पोषक झालीं पाहिजेत. निसर्गदत्त संपत्तीचीं साधनें, क्षेत्रफळ व लोकसंख्या ह्यांची राष्ट्रांमध्यें वाटणी आज अत्यंत विषमपणानें झालेली आहे, तिच्यावर उपाय कोणते व कसे योजणार ? कांहीं देशांत जमीन मुबलक व लोकसंख्या मर्यादित आहे तर दुसऱ्यांत लोकसंख्येच्या मानानें जमीन व इतर नैसर्गिक साधनें अपुरीं आहेत. ह्या रीतीनें संपन्न व दरिद्री राष्ट्रें असा विरोधात्मक भेद उत्पन्न झाला आहे आणि तो जागतिक शांततेस बाधक ठरला आहे. जगांतील एकूण अन्नोत्पादक क्षेत्रफळापैकी १२ टक्के जमीन विशिष्ट प्रदेशांस मर्यादित झालेली आहे. तसेंच शेतीस उपयोगी जमिनींपैकी फक्त चौथा हिस्सा उच्च प्रतीच्या आहेत आणि त्यांची राष्ट्रवार वाटणी अत्यंत विषम आहे. जागतिक लोकसंख्येपैकी निम्मी एशिया खंडांत वसती करून आहे, तथापि तिच्या ताब्यांतील जमीन जागतिक क्षेत्रफळाच्या पाचव्या हिश्या एवढी आहे आणि तिचें धान्याचें उत्पादन जगांतील एकूण उत्पादनाच्या एक-तृतीयांशाइतकेंच आहे. उत्तर अमेरिकेचे आकडे पहातां, तेथें एकूण जगाच्या मानानें ९ टक्के लोकसंख्या पण १७ टक्के क्षेत्रफळ व २२ टक्के धान्याचें उत्पादन आहे. राकेल तेल, कोळसा, लोखंड इत्यादि खनिज द्रव्यांची विभागणी तर ह्यापेक्षां किती तरी अधिक विषम आहे. क्षेत्र, लोकसंख्या व धान्यांचें उत्पादन जगाच्या प्रमुख विभागांत कसें वाटलें गेलें आहे हें खालीं दिलेल्या तुलनात्मक आकड्यांवरून दिसेल:—

| विभाग | क्षेत्र (%) | लोकसंख्या (%) | धान्यें (%) |
|---|---|---|---|
| युरोप ( रशिया वगळून ) | ४ | १९ | २२ |
| रशिया | १६ | ८ | १३ |
| उत्तर अमेरिका | १७ | ९ | २२ |
| दक्षिण अमेरिका | १४ | ४ | ५ |
| एशिया ( रशिया वगळून ) | २० | ५२ | ३४ |
| आफ्रिका | २३ | ७ | ३ |
| इतर | ६ | १ | १ |
| एकूण जागतिक | १०० | १०० | १०० |

हिंदुस्थानांत सध्यां ४०,००,००,००० लोक रहात आहेत, परंतु त्यांपैकीं निम्मे लोकसुद्धां कसेबसे नीट जगूं शकतील, अशी परिस्थिति नाहीं. दुसऱ्या जागतिक महायुद्धास प्रारंभ झाल्यापासून इंग्लंडच्या एकूण लोकसंख्येइतकी हिंदी लोकसंख्येंत भर पडली आहे. ही प्रवृत्ति १९६० पर्यंत कायम टिकल्यास, हिंदी लोकसंख्येंत दरसाल १ कोटि २० लाखांची वाढ होऊं लागेल. अशा परिस्थितींत दुष्काळ पडणें ही नाइलाजाची गोष्ट आहे. १९४३ मधील दुष्काळांत ३० ते ४० लक्ष लोक मेले, परंतु त्याच अवधींत त्यापेक्षां जास्त जन्मास आले !

हिंदुस्थानसारख्या देशांत लोकसंख्या वाढत आहे आणि त्यांतलें जमिनीचें क्षेत्र मर्यादित आहे. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अमेरिका वगैरे देशांतील स्थिति ह्याच्या उलट आहे, पण हिंदी लोकांस तेथें जाऊन वस्ती करण्यास मज्जाव आहे. नैसर्गिक साधनांची वाटणी राष्ट्रांमध्यें योग्य प्रमाणांत झाली नाहीं, तर मागासलेल्या देशांतलें दारिद्र्य कसें नाहींसें होणार ? लोकसंख्येची वाटणी जगभर समतेनें करण्याची समृद्ध व प्रबळ राष्ट्रांची तयारी आहे काय ? नाहींतर ॲटलँटिक सनदेची अंमलबजावणी कशी होणार ?

**आमच्या सर्व हितचिंतकांस नवें वर्ष सुखाचें जावो.**

# स्फुट विचार

## शिलकी लढाऊ सामानाची वासलात

लढाऊ सामुग्री युद्ध संपतांच निकामी होते. वापरांत आणि साठ्यांत असलेल्या ह्या सामानाचा सरकारास उपयोग नसतो आणि त्यांत अडकून राहिलेला पैसा मोकळा करणें आवश्यक होतें. कोट्यवधि रुपये किंमतीची अशी लढाऊ सामुग्री हिंदुस्थान सरकाराजवळ शिलकी आहे आणि ती आतां विकून टाकण्यांत येत आहे. युद्धकाळांत लोकांच्या उपयोगाच्या सर्वच मालाची टंचाई झाली आणि त्यासंबंधांतील आपल्या गरजा त्यांस भागवतां आल्या नाहींत. हरतऱ्हेच्या मालाविषयींची तुंबलेली जनतेची मागणी सरकारपाशीं शिलकी असलेल्या सामुग्रीनें अंशतः पुरी होण्यासारखी आहे. आपल्यापाशीं असलेल्या शिलकी मालाच्या याद्या प्रसिद्ध करून त्या खरेदीदारांस पहातां याव्या ह्यासाठीं सरकारनें मुंबई, कलकत्ता, मद्रास, कराची, कानपूर व लाहोर ह्या पांच ठिकाणीं नमुने ठेवण्याची व्यवस्था केली आहे. विकाऊ मालाचा कोणता उपयोग करतां येईल हें तज्ञ अधिकारी तेथें गिऱ्हाइकांस समजवून सांगतील. लिलावाच्या पद्धतीनें किंवा टेंडरें मागविण्यांत येऊन मालाची विक्री केली जाईल. कारखानदार, व्यापारी, कॉंट्रॅक्टर्स यांस माल खरेदीची ही चांगली संधि आहे. गेल्या वर्षीं सुमारें सत्तर लक्ष रुपयांचा माल केवळ मुंबई क्षेत्रांत खपला; आतां त्यापेक्षां मोठ्या प्रमाणांत माल विक्रीस निघेल.

---

## ब्रिटिश जनतेवर युद्धाचा ताण

इंग्लंड, अमेरिका व कॅनडा ह्या देशांतील लोकांच्या जीवनावर युद्धाचा किती ताण पडला ह्याचा तुलनात्मक दृष्टीनें विचार करतांना त्यांजमधील नैसर्गिक संपत्ति, लोकसंख्या व औद्योगिक सामर्थ्य हीं हिशेबांत घेतलीं पाहिजेत. इंग्लंडला आयात केलेल्या अन्नसामुग्रीवर नेहमींच अवलंबून रहावें लागतें, तसें अमेरिका व कॅनडा ह्यांचें नाहीं आणि युद्धपरिस्थितींत ही आयात मर्यादित होणें स्वाभाविक होतें. तसेंच, युद्धाची जबाबदारी इंग्लंडला प्रारंभापासून उचलावी लागली आणि जर्मनांच्या बॉंबगोळ्यांस तोंड द्यावें लागलें. अंतरामुळें ही आपत्ति दुसऱ्या दोन देशांस सहन करावी लागली नाहीं. युद्धकाळांत शांतता स्थितीच्या मानानें ब्रिटिश जनतेनें अकरा टक्के कमी अन्न खरेदलें, ह्याच्या उलट अमेरिकन नागरिकांच्या अन्नखरेदींत आठ टक्के वाढ झाली. वस्त्रें व इतर रोजच्या गरजेच्या वस्तू इंग्लंडमध्यें विलक्षण दुर्मिळ होऊन लोकांस हालांत दिवस काढावे लागले.

---

## ब्रिटिश सरकारचें पुरवणी अंदाजपत्रक

ब्रिटिश फडनवीस, डॉ. डॉल्टन, ह्यांनीं कॉमन्स सभेस सादर केलेल्या पुरवणी अंदाजपत्रकाचें सामान्यतः सर्व बाजूंनीं स्वागत करण्यांत आलें आहे. युद्ध समाप्त झालें तरी सरकारी खर्च तात्काळ विशेष प्रमाणांत कमी होऊं शकत नाहीं. चालू वर्षाचे प्रारंभीं माजी फडनवीसांनीं उत्पन्न व तूट ह्यांचा अंदाज केला होता तोच वर्ष अखेर खरा ठरेल असें डॉ. डॉल्टन ह्यांचें मत आहे. ह्या कारणानें ब्रिटिश जनतेस सोसावा लागणारा करांचा बोजा तूर्त हलका होणें शक्य नाहीं. तथापि, येत्या जानेवारीपासून प्राप्तीवरील कर आणि जादा नफ्यावरील कर कमी करण्यांत येणार असून त्या योगानें उत्पादनास उत्तेजन मिळेल अशी फडनवीसांस आशा वाटत आहे. मालखरेदीवरील सध्याचा कर सामान्य जनतेस जाचक वाटतो, तो विशेष जरूरीच्या जिनसांचे बाबतींत समूळ काढून घेण्याचा त्यांचा विचार आहे. सरकारी उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी होण्याला आणखी कित्येक वर्षे लोटावीं लागतील; लष्करी खर्च कमी होईल, पण सामाजिक सुधारणेवर अधिक पैसा खर्चावा लागेल. ह्यासाठीं अंदाज पत्रकाची व्याप्ति प्रत्येक वर्षापुरती मर्यादित न करतां, ती तीन चार वर्षांवर पसरावी लागेल ही महत्त्वाची सूचना डॉ. डॉल्टन ह्यांनीं पुढें मांडली आहे. तसेंच महागाई पसरूं न देण्याचें महत्त्व आणि त्यासाठीं सरकारी सहाय्याबद्दल वर्षाचे तीन-चारशें कोटि रुपये खर्चण्याची आवश्यकताहि त्यांनीं प्रतिपादली आहे. त्याचप्रमाणें, निर्गत व्यापाराचा विस्तार आणि उद्योगधंद्यांची चलती झाल्यावांचून इंग्लंडची आर्थिक स्थिति मार्गावर येणें शक्य नाहीं असेंहि त्यांनीं सांगितलें.

---

## साखर आणि अन्नधान्यें

"अधिक धान्य पिकवा" संबंधांतील मोहिमेस अनुसरून मुंबई सरकारनें महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांनीं आपल्या क्षेत्रापैकीं विशिष्ट आकाराच्या जमिनींत उसाचे ऐवजीं धान्याचीं पिकें लावलींच पाहिजेत अशी कायद्याची सक्ती केली होती. परंतु देशांतील साखरेचा पुरवठा वाढवण्याच्या आवश्यकतेच्या दृष्टीनें ही सक्ती इष्ट नाहीं असें हिंदुस्थान सरकारचें मत पडल्यामुळें प्रांतिक सरकारनें आतां ती दूर केली आहे. गेल्या हंगामांत वरील सक्तीमुळें सात हजार टन कमी साखर दक्षिणेमधील कारखान्यांत तयार झाली आणि चालू मोसमांत हा तुटवडा वाढण्याचा संभव आहे. साखरेचें उत्पादन वाढून सबंद देशाचा फायदा होईल, पण धान्याचा पुरवठा मुंबई प्रांतांत घटेल. धान्याच्या उत्पादनांतील ही तूट भरून काढण्याचें आश्वासन हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारास दिलें आहे असें समजतें. साखरेचा भाव आणखी एक वर्षभर कायम ठेवण्याचेंहि मध्यवर्ती सरकारनें ठरवलें आहे. महाराष्ट्रांत पुष्कळ गूळ उठावाच्या अभावीं पडून राहिला असल्याचा बोभाटा आहे. मुंबई प्रांताच्या बाहेर गूळ पाठवला जाण्यावर मद्रास अँड सदर्न मराठा रेल्वेनें नियंत्रण घातलें आहे हें ह्या परिस्थितीस कारण असल्याचें सांगण्यांत येतें. साठलेल्या गुळाची खराबी आणि व्यापाऱ्यांचें होणारें नुकसान लक्षांत घेतां हें नियंत्रण शिथिल केलें जाणें अगत्याचें आहे.

---

## आर्थिक विषमता केव्हां अनिष्ट नाहीं ?

आर्थिक समतावादी आणि त्यांचें ध्येय मान्य असलेला कामकरी पक्ष आज इंग्लंडमध्यें अधिकारारूढ आहे. डॉ. डॉल्टन, ब्रिटिश कामकरी मंत्रिमंडळांतले फडनवीस, ह्यांच्या पुरवणी अंदाजपत्रकावरील कॉमन्स सभेंतील चर्चेत भाषण करतांना माजी कॉंझर्व्हेटिव्ह फडनवीस, सर जॉन अँडर्सन, ह्यांनीं आर्थिक समतेसंबंधानें खालील उद्गार काढले:—"राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें पहातां आर्थिक विषमता ही वाईट नाहीं, इतकेंच नव्हे तर ती एक चांगली गोष्ट आहे. पण ह्या विधानास एक महत्त्वाची पुस्ती जोडली पाहिजे आणि ती ही आहे कीं विषमतेची पातळी फार खोल जाऊं देतां कामा नये आणि कमाल पातळी गाठण्याची संधि प्रत्येक शीलवान्, हुशार व साहसी माणसास मिळालीच पाहिजे."

# हिंदी कपाशीची आजची परिस्थिति

## भवितव्यतेचा विचार

(लेखक:—श्री. आर. जी. सरय्या, बी. ए., बी. एससी., ओ. बी. ई., जे. पी.)

### युद्धापूर्वीचें उत्पादन व खप

कपाशीचें उत्पादन करणाऱ्या देशांत सबंध जगामध्यें हिंदुस्थानचा दुसरा अनुक्रम लागतो; त्याचें वार्षिक उत्पादन ५५ ते ६० लक्ष गाठी आहे. १८७८–७९ मध्यें हिंदुस्थानचें कपाशीचें वार्षिक उत्पादन ११ लक्ष ६५ हजार गाठी इतकेंच होतें, तें वाढत जात जात १८८९–९० मध्यें ३० लक्ष गाठी व १९०५ मध्यें ३५ लक्ष गाठी झालें. पुढेंहि कपाशीखालील क्षेत्र वाढतच राहून दुसऱ्या महायुद्धाचे पूर्वी वार्षिक उत्पन्नाचा सरासरी आकडा ५५ ते ६० लक्ष गाठींपर्यंत पोंचला. हिंदी कपाशीच्या उठावाच्या दृष्टीनें तिचा ह्या देशांतील खप व तिची निर्गत ह्यांचा विचार केला पाहिजे. १९०० सालीं हिंदी गिरण्यांनीं २२ लक्ष गाठी कपाशीचा उठाव केला व तो सुमारें २८ वर्षे याच पातळीवर राहिला. १९३० चे सुमारास हिंदी वार्षिक उठाव ३० लक्ष गाठींचे घरांत आला. १९२०–२१ सालापासूनचे कपाशीच्या निर्गतीचे आकडे पाहिले तर वार्षिक निर्गत २२ लक्ष गाठींची होती असें आढळतें. १९३६–३७ चे सुमारास निर्गतीचा आकडा ४२ लक्ष गाठींवर पोंचला.

१९३५ ते ४० ह्या मुदतींत जपाननें हिंदुस्थानाकडून दरसाल सरासरीनें १५ लक्ष, २० हजार गाठी कपास घेतली. युरोपांतील देश, ग्रेट ब्रिटन आणि चीन हीं हिंदी कपाशीचीं बाकीचीं प्रमुख गिऱ्हाइकें होतीं. चीनकडील निर्गतीची १९३५–४० मधील वार्षिक सरासरी २½ लक्ष गाठी होती. युद्धापूर्वीच्या पांच वर्षांची सरासरी पाहिली, तर हिंदी गिरण्यांतील वार्षिक उठाव २८ लक्ष गाठी होता, ३२ लक्ष गाठींची निर्गत होत होती आणि एकूण उत्पादन ६० लक्ष गाठींचें होतें, असें आढळून येतें. सप्टेंबर १९३९ मध्यें युद्धास प्रारंभ झाला, तेव्हांची परिस्थिति अशी होती.

### युद्धकालीन आयात–निर्गत बंदीचे परिणाम

युद्धामुळें युरोपांतील व अतिपूर्वेकडील बाजारपेठ बंद झाली; हिंदी कपाशीस पूर्णपणें मज्जाव नसलेली ग्रेट ब्रिटनची एकमेव बाजारपेठ तेवढी उरली. अशा रीतीनें, हिंदुस्थानांतील मागणी पुरी पाडून वार्षिक उरणाऱ्या २० लक्ष गाठींच्या उठावाचा प्रश्न दत्त म्हणून पुढें उभा राहिला. ही कपास मुख्यतः आखूड धाग्याचीच होती आणि कमी नंबरच्या सुताचें कापड उत्पादन करणाऱ्या देशांत ती पुरी खपत असे. सूत व कापड ह्यांची हिंदुस्थानांत होणारी आयात आतां बंद झाली ही गोष्ट हिंदी गिरण्यांच्या पथ्यावरच पडली. अंतर्गत मागणी पुरवून मध्यपूर्वेकडील देशांकडे कापड पुरविण्याची कामगिरी हिंदी गिरण्यांकडे आली. सैनिकांच्या कपड्यासाठी व पॅरेशूटसाठी लष्करी खात्याची मोठी मागणी होतीच. ह्या वाढत्या मागणीमुळें युद्धकाळांत गिरण्यांचें उत्पादन वाढलें, तरी परदेशच्या बाजारपेठा बंद झाल्यामुळें शिल्लक पडणारी हिंदी कपास उठविण्याइतकें तें मोठें नव्हतें.

### शिलकी कपाशीचा साठा कायम

१९३९–४० मध्यें हिंदी गिरण्यांत ३० लक्ष, ५० हजार गाठी हिंदी कपाशीचा उठाव झाला होता; १९४२-४३ मध्यें तो वाढून ४३ लक्ष, ७ हजार गाठी भरला. युद्धकाळांत कोणत्याच वर्षी इतकी हिंदी कपास हिंदी गिरण्यांनीं घेतली नव्हती, इतकेंच नव्हे तर आतांपर्यंत कोणत्याच वर्षी एवढा उठाव झाला नव्हता. १९४३–४४ मध्यें ४१ लक्ष, १९ हजार गाठींचा व १९४४–४५ मध्यें ४१ लक्ष, ६२ हजार गाठींचा उठाव झाला. हिंदी गिरण्यांनीं १९४०–४५ ह्या काळांत परदेशी कपासहि वाढत्या प्रमाणावर उपयोगांत आणली. १९३४–३९ मधील परदेशी कपाशीच्या खपाची हिंदी गिरण्यांतील वार्षिक सरासरी ५ लक्ष, २ हजार गाठी होती; १९४०-४५ मधील वार्षिक सरासरी ५ लक्ष, ७१ हजार गाठींवर गेली. हिंदी गिऱ्हाइकांची बदललेली आवड आणि लष्करी खात्याची पॅरेशूट कापडाची व इतर प्रकारच्या कापडाची मागणी, हें परदेशी कपाशीचा खप वाढण्याचें कारण आहे. युद्धपूर्व पांच वर्षांतील हिंदी कपाशीचा वार्षिक सरासरी उठावाचा आकडा २८ लक्ष, १५ हजार गाठी होता, तो युद्धकाळांत ३८ लक्ष, ८० हजार गाठी झाला; म्हणजे दरसाल १० लाखांवर गाठी ज्यास्त खपल्या, तरी उरणाऱ्या कपाशीचा प्रश्न सुटूं शकला नाहीं. त्यामुळें, शिलकी कपाशीचा साठा फुगत चालला. १९३८-३९ मध्यें १७,८९,००० गाठी पडून होत्या; १९४३-४४ मध्यें त्यांचा आकडा ४७,१०,००० गाठींवर गेला. १९४४-४५ मोसमाचे असेर ४० लक्ष, ७ हजार गाठी पुढील वर्षाकरितां शिलक रहातील, अशी अपेक्षा आहे. नुकत्याच संपलेल्या मोसमांतील कपाशीचें उत्पादन फक्त ३८ लक्ष, ८ हजार गाठी इतकेंच भरलें. त्यामुळें कपाशीच्या शिलकी साठ्याचा आकडा थोडाफार कमी होऊं शकला.

### कपाशीच्या क्षेत्राचें संकोचन

युद्धकाळांत कपाशीचें परदेशांतील गिऱ्हाईक बंद झालें आणि त्याचवेळीं हिंदुस्थानांतील अन्न परिस्थिति अत्यंत कठीण झाली. ह्यावर उपाययोजना म्हणून कपाशीच्या लागवडीची जागा धान्यांनीं घ्यावी अशा धोरणाचा इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें पुरस्कार केला आणि मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं कमीअधिक प्रमाणांत ह्या धोरणाचा अंगीकारहि केला. कपास व तंबाखू ह्यासारख्या व्यापारी पिकांऐवजीं धान्याची लागवड व्हावी ह्यासाठीं मुंबई सरकारनें तर प्रत्यक्ष कायद्याचा उपाय अवलंबिला. कपाशीखालील क्षेत्रांत अशा रीतीनें घट झाली नसती, तर तिची अवस्था फार वाईट झाली असती, हें उघड आहे. कपाशीच्या क्षेत्राचें आकुंचन कसें होत गेलें, हें खालील आकडे स्पष्ट दर्शवितातः—

| वर्ष | कपाशीखालील क्षेत्र (एकर जमीन) |
|---|---|
| १९३८–३९ | २,३४,१०,००० |
| १९३९–४० | २,१५,८०,००० |
| १९४०–४१ | २,३३,११,००० |
| १९४१–४२ | २,४१,५१,००० |
| १९४२–४३ | १,९२,०३,००० |
| १९४३–४४ | २,०३,९८,००० |
| १९४४–४५ | १,४८,०२,००० |

### कपाशीच्या किंमतींत वाढ नाहीं !

युद्धजन्य चलनविस्तारामुळें इतर मालाच्या किंमतींत पुष्कळच वाढ झाली, परंतु त्याचा फायदा कपाशीस मिळूं शकला नाहीं. शिलकी कपाशीचा —विशेषतः आखुड धाग्याच्या कपाशीचा—मोठा साठा साचलेला राहिला होता, हें त्याचें प्रमुख कारण आहे. कपाशीची किंमत वाढली तर नाहींच, उलट १९४४-४५ मध्यें तिला टेकू देऊन उचलून धरावें लागलें.

### भवितव्य—मर्यादित आशेस जागा

हिंदी कपाशीच्या भवितव्याचा विचार करतां, अवास्तव अपेक्षांस जागा नसली तरी मर्यादित आशावादास आधार आहे, असें म्हणतां येईल. सबंद जगांत कापडाचा तीव्र तुटवडा पडला आहे आणि हिंदी गिरण्यांची कमाल उत्पादन शक्ति उपयोगांत आणणें शक्य आहे. कांहीं काळ तरी हिंदी गिरण्यांतील स्थानिक कपाशीचा उठाव वार्षिक ४० लक्ष गाठींचे खालीं जाण्याचा संभव नाहीं. परंतु, वार्षिक उत्पादन ४० ते ५० लक्ष गाठींचें आहे आणि त्यावर ४० लक्ष शिलकी गाठींचा साठ्याचें दडपण आहे, तेंहि विचारांत घेतलें पाहिजे.

### जपानकडे किती निर्गत शक्य आहे ?

निर्गतीच्या शक्याशक्यतेचा विचार करता, युद्धापूर्वीच्या प्रमाणांत जपानशीं व्यापार पुनः सुरू होण्याचा बिलकुल संभव दिसत नाहीं. युद्धानें जपानच्या सुमारें दोन तृतीयांश गिरण्यांचा नाश केलेला आहे. युद्धकाळांत बहुतेक सर्व जपानी गिरण्या नाश पावल्या, असें प्रत्यक्ष कॉटन स्पिनिंग असोसिएशन ऑफ जपाननेंच प्रसिद्ध केलें आहे. १९३७ मध्यें जपानमध्यें १,२७,८०,००० चात्यांच्या २९१ गिरण्या होत्या; आतां सुमारें ३० लक्ष चात्यांच्या फक्त ३९ च गिरण्या चालू आहेत. हिंदुस्थान दरसाल ३२,०९,००० गाठी कपास निर्गत करीत असे त्यापैकी एकटा जपान १५,६२,००० गाठी घेई, अशी युद्धापूर्वीच्या पांच वर्षांतील वार्षिक सरासरी आहे. त्याच आधारावर हिशेब केला, तरी येतीं कांहीं वर्षें, त्याच्या गिरण्या पूर्वस्थितीस येईपर्यंत, जपान दरसाल २ लक्ष गाठीपेक्षां अधिक हिंदी कपास घेऊं शकणार नाहीं. इतक्याहि कपाशीचा उठाव होणें हें व्यापारविषयक सवलती पूर्ववत् उपलब्ध होणें, वहातुकीची सोय व निर्गत व्यापाराला लागणाऱ्या पैशाची व्यवस्था ह्यांवर सर्वस्वीं अवलंबून आहे. तेव्हां ह्या गोष्टींवर कांहीं काळ तरी विसंबून न बसणें श्रेयस्कर होईल. एक-दोन वर्षें जपानकडे निर्गत अजीबात होणार नाहीं, असें गृहीत धरून आपण चाललें पाहिजे.

### इतर देशांत खप—अमेरिकेची स्पर्धा

ह्या उलट ग्रेट ब्रिटन, युरोपांतील देश आणि चीन ह्यांकडे हिंदी कपाशीची निर्गत होण्यास अनुकूलता आहे. तथापि, अमेरिकेचा स्वस्त कापूस ह्या देशांस मोठ्या प्रमाणावर मिळूं लागेल ही गोष्ट प्रस्तुत संबंधांत विशेष चिंतनीय आहे. (१) एक पाउंड कपाशीस चार सेंट, म्हणजे प्रत्येक खंडीस १०४ रुपये एवढी सरकारी मदत देऊन, (२) निर्गतीस वहातुकीच्या आगबोटी उपलब्ध करून व (३) सरकारी व निमसरकारी द्वारा निर्गतीच्या व्यापारास लागणारा पैसा पुरवून शक्य तेवढी कपास निर्गत करण्याचें अमेरिकेचें धोरण आहे. अशा रीतीनें कितीतरी कपास स्पेन, हॉलंड, बेल्जम व स्वित्सरलंड ह्या देशांकडे पाठविण्यांत आली आहे. ह्या स्पर्धेमुळें, परराष्ट्रीय बाजारपेठांतील हिंदी कपाशीचा वाटा कमी होणार हें उघड आहे. कपास खरीदण्याऱ्या देशांना, हिंदी कपास घेऊन तिची किंमत पौंडांत देणें हें अमेरिकन कपास घेऊन डॉलर देण्यापेक्षां अधिक सोईचें वाटलें तरी वहातुकीसाठी आगबोटींत कपाशीस जागा मिळण्याची मारामार व निर्गत व्यापारांत अडकणाऱ्या पैशाच्या वसुलीच्या योग्य व्यवस्थेचा अभाव ह्यांची गैरसोय हिंदी कपाशीस सोसावी लागेल. ह्या सवलती उपलब्ध करून देऊन हिंदी कपाशीच्या निर्गतीस प्रत्यक्ष मदत करण्याचें हिंदुस्थान सरकारनें आपल्या अंगावर घेणें अर्थांतच जरूर आहे. ह्या बाबतींत योग्य तें सहाय मिळालें, तर येत्या वर्षी १० ते १२ लक्ष गाठींची निर्गत होण्यास अडचण पडणार नाहीं. १९४५-४६ च्या मोसमाचा अगदी ठोकळ अंदाज खालील प्रमाणें करतां येईल:—

| | | |
|---|---|---|
| अंदाजी शिलकी कपास | ४० लक्ष गाठी | |
| „ उत्पादन | ४५ „ „ | |
| एकूण पुरवठा | | ८५ लक्ष गाठी |
| गिरण्यांतील अंदाजी उठाव | ४० ते ४२ लक्ष गाठी | |
| अंदाजी निर्गत | १० ते १२ „ „ | |
| एकूण | | ५० ते ५४ लक्ष गाठी |
| अंदाजी शिलकी कपास (१९४५-४६ अखेर) | | ३५ ते ३६ लक्ष गाठी |

### कपाशीचे वाढते उपयोग

मोसमाचे अखेर शिलक पडणाऱ्या कपाशींत घट होणें म्हणज तिला चढती किंमत येणें असा साधारणतः अर्थ केला जातो. तेव्हां वरील आकड्यांवरून मर्यादित आशावादास जागा असल्याचें दिसतें. कपाशीच्या लागवडीचें क्षेत्र आतां संकुचित झालें आहे तें तसेंच टिकलें आणि "अधिक धान्य पिकवा" मोहिमेचा पुरस्कार तडफेनें केला (त्याची अद्याप फार आवश्यकता आहेच) तरच हा आशावाद खरा ठरेल. हिंदी कपाशीची लागवड व उत्पादन हीं मागणीच्या मर्यादेंत राखण्यावरच फाजील पुरवठ्याच्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल अवलंबून आहे. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें ह्या दृष्टीनें पाऊल टाकलें असून, हिंदुस्थानांतील कपाशीच्या योजनात्मक उत्पादनाबाबत तिनें शिफारसी केल्या आहत. दरमाणशी कापडाचा खप विचारांत घेतला, तर जगांतील सर्व देशांत हिंदुस्थानाचा अनुक्रम तळाशीं लागतो आणि हिंदी गिरण्यांनीं केलेल्या योजनांत त्यांच्या उत्पादनांत बरीच मोठी वाढ अपेक्षित आहे, हें लक्षांत घेतां हिंदी कपाशीच्या हिंदुस्थानांतील उठावांत पुष्कळच वाढ होण्याची अपेक्षा आपण करण्यास कांहींच हरकत नाहीं. गिरण्यांत बसविण्यासाठी यंत्रसामुग्री लागेल, ती कोरी करकरीत मिळण्याच्या प्रमाणावर कापडाचें उत्पादन व कपाशीचा उठाव अवलंबून रहाणार हें उघड आहे. तेव्हां नव्या यंत्रसामुग्रीच्या आयातीस हिंदुस्थान सरकारनें सर्वतोपरी सहाय करणें अगत्याचें आहे. मोटार गाड्या, मोटारींच्या धांवा, प्लॅस्टिक्स, कृत्रिम रेशीम, वगैरे धंद्यांत हिंदी कपाशीचा नवा उपयोग होऊं लागण्यासहि बराच वाव आहे. त्यासाठी लागणारें संशोधन मोठ्या प्रमाणावर सत्वर सुरू करण्यांत येण्यावर आणि सर्वसाधारणपणें सर्वच हिंदी धंद्यांच्या अभिवृद्धीवर ही घटना अवलंबून आहे.

## खेडेगांवी उद्योगधंद्यांची संघटना


( लेखक:—श्री. वैकुंठराय ल. मेहता. )

मुंबई सरकारच्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनेंत औद्योगिक सुधारणेचा उल्लेख फारच तुरळक आढळतो अशी त्या योजनेवर एक टीका करण्यांत आलेली आहे. १९१४-१८ च्या पहिल्या जागतिक युद्धापर्यंत हिंदुस्थानामध्यें आर्थिक बाबतींत सरकारच्या बेफिकीरपणाच्या वृत्तीचा अंमल होता,त्यामुळें शेती आणि उद्योगधंदे ह्यांचेमधील प्रमाणबद्धता नाहींशी झालेली होती. उद्योगधंदे वाढवून ही प्रमाणबद्धता राखण्यावरच हिंदुस्थानाचा आर्थिक उद्धार अवलंबून आहे असें हिंदी अर्थशास्त्रज्ञ गेलीं ५० वर्षें सांगत आले आहेत. हातमाग प्रभृति स्थानिक उद्योगधंद्यांच्या पुनर्घटनेस सहायकारक होण्यासाठी वेगवेगळ्या जिल्ह्यांत औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्याच्या उपक्रमाच्या निर्देशापलीकडे औद्योगीकरणाचा उल्लेख मुंबई सरकारच्या योजनेंत आढळत नाहीं. कोणते उद्योगधंदे हातीं घ्यावयाचे व त्यांची पुनर्घटना कोणत्या पद्धतीनें करावयाची, ह्याबद्दल योजना कांहींच सांगत नाहीं.

ह्या टीकेचा सरकारवर थोडाफार परिणाम झालेला दिसतो. कारण, मुंबई सरकारनें कांहीं महिन्यांपूर्वी एक औद्योगिक समिति नेमून, प्रांताच्या औद्योगिक सुधारणेची योजना आखण्याचें काम तिचेकडे सोपविलें. समितीनें कित्येक उपसमित्या नेमल्या आहेत, त्यांत खेडेगांवी व लहान उद्योगधंद्यांच्या विचारासाठींहि एक उपसमिति आहे. मुंबई सरकारनें आपल्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनांत औद्योगिक प्रगतीच्या प्रश्नास स्थान दिलें हें ठीकच झालें. परंतु, सरकारनें १९३८ सालीं नेमलेल्या "आर्थिक व औद्योगिक पहाणी समिती"चा रिपोर्ट १९४० सालीं प्रसिद्ध झाला, त्यांतील शिफारशींचा विचार करण्याचें काम आतां हातीं घेण्यांत आलें असतें तर निदान तातडीच्या प्रश्नांपुरतें तरी तें फार बरें झालें असतें, असें म्हटल्याविना रहावत नाहीं. हिंदुस्थानाच्या आर्थिक नियोजनाचा रिपोर्ट लिहिणाऱ्या मुंबईच्या प्रमुख उद्योगपतींतील एक पुढारी, सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांच्या अध्यक्षपदाचा लाभ उपरिनिर्दिष्ट पहाणी समितीस लाभलेला होता. नुकतेंच, १९४० सालीं, एका तज्ज्ञ समितीनें जमा केलेली माहिती सरकारपुढें असतांना, आतां चालू परिस्थितीची व आवश्यक सुधारणांची पुनः चौकशी करविण्यांत होणारा काळाचा व पैशाचा अपव्यय सहज टाळतां येण्याजोगा होता.

स्थानिक उपलब्ध असलेला कच्चा वापरणाऱ्या, स्थानिक कामगारांस काम देणाऱ्या (ते कामगार कायम बेकार रहाणारे असोत किंवा वर्षांतील कांहीं महिने फक्त बेकार रहात असोत) व खेडेगांवांतच बनविलेल्या हत्यारांचा व यंत्रसामुग्रीचा उपयोग करणाऱ्या खेडेगांवी उद्योगधंद्यांचे बाबतींत मुंबई सरकारचें धोरण काय राहील, हें त्यानें खेडेगांवांतील उद्योगधंद्यांच्या वाढीच्या कार्यास हात घालण्यापूर्वी स्पष्टपणें जाहीर करणें अगत्याचें आहे. निदान संक्रमण काळांत तरी उपभोक्त्यांस लागणाऱ्या वस्तू तयार करणाऱ्या खेडेगांवी उपक्रमास प्रोत्साहन देण्यांत यावें, कारण कमी भांडवलांत त्यामुळें बरेंच मोठें स्थानिक उत्पादन उपलब्ध होईल आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या नियोजित प्रयत्नास त्याला अडथळा होण्याजोगा नाहीं, असें मुंबईच्या उद्योगपतींच्या योजनेंत मान्य करण्यांत आलेलें दिसतें. मुंबई सरकारास ही विचारसरणी मान्य आहे काय? मुंबई औद्योगिक आणि आर्थिक पहाणी समितीनें हिंदी आर्थिक संसारांतील दुय्यम व खेडेगांवी उद्योगधंद्यांस निश्चित स्थान कोणतें आहे आणि मोठ्या आणि लहान प्रमाणावरील कापडाच्या धंद्यांचे परस्पर नातें कसें नियंत्रित करण्यांत यावें ह्याविषयीं सरकारकडून स्पष्ट खुलासा मागितला होता. खेडेगांवी उद्योगधंद्यांच्या वाढीची समाधानकारक योजना आखण्यापूर्वी ह्या दोन्ही बाबतींत सरकारनें आपलें धोरण जाहीर करणें अत्यावश्यक आहे.

आगामी नियोजनांत खेडेगांवी उद्योगधंद्यांची संघटना कोणत्या आर्थिक तत्त्वावर करावी, ह्याचाहि विचार करणें जरूर आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वावर सध्या ती आधारलेली आहे आणि त्यामुळें तीमध्यें कारागीर किंवा कामगार ह्यांचें जीवित बहुंशीं सावकार किंवा कारखानदार ह्यांचेवर अवलंबून आहे. ह्या संघटनेंत बहुतेक सर्व कामगारांची पैशाची पिळवणूक होते आणि आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें तें हितकारक नाहीं. कारखान्यांतील कर्जबद्ध कामगार हा "रॉयल कमिशन ऑन लेबर"चे म्हणण्याप्रमाणें, कार्यक्षम कामगार होऊंच शकत नाहीं. कर्जानें जर्जर झालेल्या कारागिराचे बाबतींत हें जास्तच प्रमाणांत सत्य ठरतें, कारण काम पुरवणाराचें किंवा सावकाराचें धन करण्यासाठीच केवळ आपण कष्ट करीत आहोंत ह्याची त्यास सदैव जाणीव रहाते. अशा परिस्थितींत, उत्पादनांत सुधारणा अशक्यप्राय आहे. केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, तर सबंद जगांत सर्वत्र असाच अनुभव आलेला आहे. एक छपराखालीं कारागिरांना एकत्र आणून, सरकारी व्यवस्थेखालीं नाहीं तरी निदान सरकारी नियंत्रणाखालीं, त्यांस काम पुरवावें, अशी कांहींची सूचना आहे. उत्पादकांच्या सहकारी संघटनेपेक्षा ही व्यवस्था अधिक फलदायी होऊन यांत्रिक प्रगतीस ज्यास्त पोषक ठरते काय आणि तिचेमुळें कारागीर कार्यप्रवण होण्यास अधिक उत्तेजन मिळेल काय? असें असल्यास, त्याची संघटना कशी घडवून आणावी? आपली योजना अंमलांत आणण्याचे बाबतींत पुढचें पाऊल टाकण्यापूर्वी सरकारनें ह्याहि प्रश्नांचा काळजीपूर्वक विचार करून त्यांचें उत्तर दिलें पाहिजे.



M/s TRIO & Co.
HIGH CLASS FURNISHERS.
396 B. Sadashiv, Poona 2.

# दिवाळी

## व नवें वर्ष आपणांस सुखाचें जावो.



## ओगले ग्लास वर्क्स लि.

ओगलेवाडी ( औंध संस्थान )

जिल्हा सातारा

## आमच्या ग्राहकांस

# दीपावली व नवें वर्ष

## सुखाचें जावो !




## आयुर्वेद रसशाळा पुणें

## लि., पुणें नं. ४



# सारस्वत

## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[ स्थापना १९१८ ]

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३०-९-१९४५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,५६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... | रु. १,६४,००० |
| ठेवी | ... | रु. ५२,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५७,००,००० |

**शेअर विक्री चालू आहे.**

सभासदांना जॉईंट स्टॉक कंपन्यांच्या शेअरवर सवलतीच्या दरानें कर्ज, ओव्हरड्राफ्ट, अगर कॅश क्रेडिट देण्यांत येतें.

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा—

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना—१९३५ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु.१,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ८५,०६० |
| रिझर्व्ह फंड | रु. ११,६९० |
| इतर फंडस् | रु. ८५६३-१३-१० |
| एकूण खेळतें भांडवल | रु.९,६२,९९१-११—७ |

चेअरमन :

श्री. गणेश कोंडो गोडबोले, B. A. LL. B.

- गेलीं ७ वर्षे बँकेनें ६¼% प्रमाणें सभासदांस डिव्हिडंड दिलें आहे.
- माफक दरानें सोनें, माल व स्थावर मिळकत, सरकारी रोखे, शेअर्स वगैरेचे तारणावर कर्ज दिलें जातें.
- योग्य जामीन दिलेस कॅशक्रेडिट व लोन दिलें जातें. सर्व प्रकारचे बिलांची वसुली व मुंबई, पुणें, किर्लोस्करवाडीचे चेकस व इतर बँकिंगचीं सर्व कामें केलीं जातात.

ल. य. लागू, B. A. LL. B.
मॅनेजर.

# प्रॉव्हिडंट विमा कंपन्यांचें कार्यक्षेत्र

## समाजाच्या खालच्या थरापर्यंत विम्याचें बीज रुजविण्याचें महत्त्व

( लेखकः—श्री. गो. श्री. दिवाण, एम. ए., एफ. आय. ए. )

सर्व जगांमध्यें प्रगतिपर विचारसरणीचें सदासर्वकाळ एकच ध्येय असूं शकतें, व तें हें कीं, जगांतील सर्वसाधारण मनुष्यसमाजाचें राहणीचें मान कसें वाढेल; दारिद्य, बेकारी, अनारोग्य अशांसारख्या मनुष्यजातीचें अकल्याण करणाऱ्या गोष्टी नाहींशा कशा होतील; व एकंदरींत मानवी जीवन ही मनुष्यप्राण्याला भूषणावह अशी संस्था कशी बनेल. आपल्या देशापुरतेंच बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, येथील सर्व देशहितचिंतकांचा एकच हेतु आहे व तो हा कीं, सर्वसाधारण हिंदी मनुष्याची राहणी कशी सुधारेल. राजकीय सत्तेशिवाय इतका व्यापक हेतु सिद्धीस जाणें शक्य नाहीं हें जरी अर्थातच खरें असलें, तरी ह्या हेतूच्या सिद्ध्यर्थ हल्लींच्या राजकीय परिस्थितींतही जेवढा प्रयत्न करणें शक्य आहे, तेवढा करणें हितावहच ठरेल. सर्वसाधारण जनसमाजाची राहणी सुधारण्याचा मार्ग असा आहे कीं, मानवी जीवनास ज्या वस्तुनिष्ठ किंवा कृतिनिष्ठ सोयींची गरज आहे त्या सोयी पुरेशा प्रमाणांत उत्पन्न करून त्यांची गरजेप्रमाणें समाजाच्या निरनिराळ्या घटकांमध्यें योग्य प्रमाणांत वांटणी करावयाची. ह्या मार्गाच्या अवलंबनामध्यें विमा संस्थेच्या कार्यास एक विशिष्ट स्थान आहे. एखादी विशिष्ट गरज ज्यांना ज्यांना म्हणून वाटण्याचा संभव आहे त्यांच्याकडून वर्गणीच्या रूपानें पैसा घेऊन ज्यांना ज्यांना म्हणून ती गरज पुढें प्रत्यक्ष वाटेल त्यांना अशी गरज प्रत्यक्ष वाटण्याच्या वेळीं पैसा देऊन मदत करणें ही तर विमासंस्थेची अंतर्भूत कार्यपद्धति आहे; पण उत्पादित संपत्तीचा ओघ जेथें गरज आहे तेथें वळविणें अशा स्वरूपाच्या विमासंस्थेच्या वरील कामगिरीशिवाय दुसरीही एक कामगिरी विमासंस्था बजावते. विम्याची किंमत म्हणून विमेदारांकडून जमा केलेले हप्त्यांचे पैसे कमीअधिक काळपर्यंत विमासंस्थेस अशा रीतीनें गुंतवतां येतात कीं त्यामुळें देशांतील उद्योगधंद्यांची भरभराट व्हावी व अशा रीतीनें देशांतील सर्व उत्पादित संपत्तीमध्यें वाढ व्हावी. संपत्तीच्या ओघाला इष्ट दिशेनें वळण लावणें व संपत्तीच्या उत्पादनालाही अप्रत्यक्ष रीत्या मदत करणें असें जें दुहेरी स्वरूपाचें कार्य विमासंस्था बजावते त्याचें, समाजाची राहणी सुधारण्याचा जो मूलग्राही व व्यापक प्रश्न आहे तो सोडवण्यामध्यें, असें महत्त्वाचें स्थान आहे.

### " उद्यांची तरतूद "

आपल्या देशामध्यें विमासंस्थेची म्हणण्यासारखी भरभराट अजून झाली नाहीं व जी कांहीं थोडी भरभराट दिसते ती समाजाच्या वरवरच्या वर्गामध्येंच बहुतांशीं आहे. समाजाच्या अगदीं खालच्या थरापर्यंत विमासंस्थेचें बीज रुजावयास आपल्या देशामध्यें अनेक दुर्लंघ्य अडचणी आहेत. ज्यांची आजचीच गरज पूर्ण भागत नाहीं असा जो जवळजवळ अर्धपोटी असलेला देशांत मोठा वर्ग आहे त्यांना उद्यांची तरतूद करण्यासाठी विमा उतरा असें म्हणणें म्हणजे त्यांच्या सांप्रतच्या स्थितींत हल्लींच्या समाजव्यवस्थेचा जो अन्याय प्रतीत होतो, त्या अन्यायाच्या जोडीला अपमानाच्या डागण्या देण्यासारखेंच होय. असा वर्ग सोडून जेथें जेथें " उद्यांची तरतूद " ह्या शब्दांचा अर्थ आकलन होण्यासारखी परिस्थिति आहे तेथें तेथें विमासंस्थेनें आपलें कार्यक्षेत्र पसरावें, विम्याच्या किंमतीच्या रूपानें वसूल झालेला पैसा अशा रीतीनें गुंतवावा कीं देशांत उद्योगधंद्यांची वाढ व्हावी. ह्या उद्योगधंद्यांमध्यें आज विमासंस्थेच्या कक्षेबाहेर असलेल्यांपैकीं अधिक लोकांना कामधंदा देऊन त्यांची आजची गरज एवढ्या तरी प्रमाणांत नाहींशी करावी कीं उद्यांची तरतूद करण्याची त्यांना स्वाभाविकच इच्छा व्हावी, व अशा रीतीनें आपल्या लोकोपयोगी कार्यानें आपलीहि भरभराट विमासंस्थेनें करून घ्यावी.

### खालच्या वर्गांत विम्याचा प्रसार

अशा प्रकारचें महत्त्वाचें कार्य विमासंस्थेनें करावें म्हणून १९३८ च्या विमाकायद्यानें प्रॉव्हिडंट विमा कंपन्यांना पृथक् असें कार्यक्षेत्र निर्माण करून दिलें. प्रॉव्हिडंट कंपन्या ह्या गरीबांच्या विमा कंपन्या होत; इंग्लंडमध्यें ज्या मानानें इंडस्ट्रिअल ॲशुअरन्स ( कामकऱ्यांचा विमा ) ह्या संस्थेची भरभराट झाली आहे त्या मानानें, आपल्याकडील वेगळी परिस्थिति लक्षांत घेऊनही, आपल्या प्रॉव्हिडंट कंपन्यांची वाढ झाली नाहीं ही गोष्ट कबूल केली पाहिजे. किंबहुना आपल्याकडील प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स सोसायट्यांची स्थिति, कांहीं थोडे अपवाद सोडल्यास, अतिशय शोचनीय आहे. अशा सोसायट्यांच्या चालकांनीं समाजांतील साधारणपणें खालच्या परंतु विमा उतरतां येण्यासारखी सांपत्तिक स्थिति असलेल्या अशा वर्गांमध्यें विम्याचा प्रसार फारसा केल्याचें दिसून येत नाहीं. ज्यांना मोठ्या विमाकंपन्यांमध्यें विमा उतरण्याची ऐपत आहे व ज्यांनीं अशा प्रकारचा मोठ्या रकमेचा विमा उतरलेलाही आहे अशांनींच चालकांच्या भिडेखातर अगर अशाच कांहीं दुसऱ्या कारणांमुळें प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कंपनीमध्यें लहान रकमेचा विमा उतरावा; व अशासारख्यांनींच उतरलेल्या विम्यांची प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कंपन्यांच्या कामामध्यें बहुसंख्या असावी असेंच सकृद्दर्शनीं तरी वाटतें. वरच्या वर्गांतील मनुष्यांनीं प्रॉव्हिडंट कंपनींत विमा उतरण्यांत गैर असें कांहींच नाहीं; उलट असेंही म्हणतां येईल कीं अशा प्रकारचा विमा उतरून ह्या वर्गांनीं प्रॉव्हिडंट कंपन्यांची कार्यक्षमता वाढवावी, व तेणेंकरून ह्या कंपन्यांकरवीं अप्रत्यक्ष रीत्या कां होईना संपत्तीचा ओघ खालच्या वर्गांत अधिक प्रमाणांत वहावा ह्याबद्दलची आपली नैतिक जबाबदारी पार पाडावी. तथापि प्रॉव्हिडंट कंपन्यांचें मुख्य कार्यक्षेत्र समाजाच्या वरच्या वर्गांमध्यें नसून तें त्याहून थोड्याश्या खालच्या वर्गामध्येंच आहे; व ह्या दुसऱ्या प्रकारच्या वर्गांमध्यें जितक्या प्रमाणांत विमासंस्थेचा प्रसार होईल तितक्या प्रमाणांतच प्रॉव्हिडंट कंपन्या यशस्वी झाल्या असें म्हणतां येईल. ह्या खालच्या वर्गाच्या विमाविषयक गरजा नक्की कोणत्या प्रकारच्या आहेत हें अभ्यासिलें पाहिजे व ह्या गरजानुरूप त्यांच्या आटोक्यांतील असेच विमाप्रकार प्रॉव्हिडंट कंपन्यांनीं अमलांत आणले पाहिजेत. अशा खालच्या वर्गांतील विमेदारांकडून विम्याच्या किंमतीचे हप्ते घरोघरीं जाऊन वसूल करण्याची पद्धत इंग्लंडप्रमाणें येथेंही जरूर पडेल; व कदाचित् केलेल्या कामावर टक्केवारीनें वेतन घेणाऱ्या प्रचारकांऐवजीं प्रॉव्हिडंट कंपन्यांमध्यें ठराविक पगार घेणारे प्रचारक अधिक उपयुक्त ठरतील. प्रॉव्हिडंट कंपन्यांनीं आपल्या कार्यक्षेत्राची रूपरेखा आंखावी; व आस्थेवाईक, चिकाटीचे व उच्च हेतूनें प्रेरित झालेले असे कार्यकर्ते हातांशीं धरून शास्त्रशुद्ध रीतीनें विम्याचा

प्रचार सालच्या वर्गांत करावा. प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कंपन्यांची समाजाला गरज आहे; परंतु भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत नेहमींच ज्यांची गरज आहे अशाच संस्था काढल्या जातात असें नाहीं, तर ज्यांपासून तात्कालिक व पुरेसा फायदा मिळूं शकतो अशाच संस्था काढल्या जातात. मोठ्या विमा कंपन्या काढल्यापासूनही तात्कालिक फायदा मिळणें नेहमींच शक्य होतें असें नाहीं; व प्रॉव्हिडंट कंपन्यांपासून तर गुंतवलेल्या भांडवलावर व्याज मिळणें ही गोष्ट कालांतरानेंच शक्य होणारी आहे. हिंदुस्थान सरकारच्या विमाधिकाऱ्यांनीं १९४४ च्या विमाविषयक प्रतिवृत्तांत म्हटल्या-प्रमाणें विम्याच्या धंद्याची तुलना बालसंगोपनाशींच करतां येते. आईबाप निःस्वार्थीपणें बालसंगोपन करतात; परंतु जितक्या प्रमाणांत हें बालसंगोपन चांगल्या प्रकारचें होतें तितक्या प्रमाणांत मूल मोठें झालें म्हणजे आपल्या आईबापांचें व समाजाचेंही ऋण फेडतें. अगदीं ह्याचप्रमाणें प्रारंभीं अतिकसोशीनें सांभाळलेल्या विमा कंपन्या पुढें ऊर्जितावस्थेस येतात, व आपल्या भांडवलदारांस गुंतवलेल्या भांडवलावर योग्य मोबदला देतात; एवढेंच नव्हे तर आपल्या कार्यानें समाजाचें आर्थिक स्थैर्य उत्पन्न करण्यास व टिकविण्यास हातभार लावतात.

वरील लिखाणाचा हेतु असा आहे कीं विचारवंतांनीं प्रॉव्हिडंट विमा कंपन्यांच्या कार्यक्षेत्राविषयीं आपल्या देशाची परिस्थिति लक्षांत घेऊन साधकबाधक चर्चा करावी; व ह्या कंपन्यांच्या वर सांगितलेल्या सत्या कार्याची कल्पना व्यवहार्य ठरल्यास धनिकांनीं व संपन्न अशा संस्थांनीं ती कल्पना सत्यसृष्टींत उतरविण्यास केवळ स्वहिताच्या दृष्टीनें नव्हे तर देशहिताच्या दृष्टीनेंही प्रेरित व्हावें.

## हिंदुस्थानांत साखरेस मागणी वाढली

### शुगर कंट्रोलरचा खुलासा

" १९४१ सालानंतर हिंदी लोकसंख्येंत कांहींहि वाढ झाली नाहीं ह्या आधारावर हिशेब केला तर ५,००० वस्तीवरील शहरांतील प्रत्येक मनुष्यास सालीना १२ शेर व खेड्यांतील मनुष्यास ३ शेर साखर ह्या वाटपानें हिंदुस्थानास दरसाल १५,००,००० टन साखर लागेल. युद्धापूर्वीच्या साखरेच्या खपाची सरासरी १० ते १५ लक्ष टनांची आहे. बिस्किटें, खाऊ इत्यादींच्या उत्पादनास लागणारी साखर हिशेबांतून वगळली तरी १९४४–४५ मध्यें नागरिकांच्या खाजगी वापरासाठीं १० लाख टनांवर साखर लागली. शहरांतील साखरेचा खप वाढत आहे.

" मुंबई प्रांतांतील साखरेचें उत्पादन १०,००० टनांनीं घटलें आहे, त्याचें कारण सरकारचें " अधिक धान्य पिकवा " हें धोरण होय. युद्धापूर्वी जेव्हां ऊंस मुबलक होता तेव्हांहि हिंदुस्थानांतील साखरेचें एकूण उत्पादन १२ लक्ष टनांपेक्षा अधिक नव्हतें. तेव्हां १५ लक्ष टनांचें उत्पादन आज शक्य होणार नाहीं. "

### युद्धनिर्वासितांची हिंदुस्थानांत गर्दी

मलाया, ब्रह्मदेश इत्यादि पूर्वेकडील रणक्षेत्रांतून इकडे आलेल्या निर्वासितांची शिरगणती १९४३–४४ मध्यें करण्यांत आली तेव्हां अशा लोकांची संख्या साडेचार लक्ष असल्याचें आढळलें. सदरहु देशांतून आलेल्या फक्त हिंदी निर्वासितांच्या खर्चाची जबाबदारी हिंदुस्थान सरकारावर पडते आणि तत्प्रीत्यर्थ १९४३-४४ सालीं सुमारें तीन कोटि रुपये खर्च झाले.


कोल्हापूर इलाख्यांतील आद्य सहकारी संस्था

# दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## कोल्हापूर

स्थापना १९१३ इसवी

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ७५,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... | रु. ४५,६६० |
| रिझर्व्ह फंड | ... | रु. ६४,२३० |
| इतर फंडस | ... | रु. ६७,९७० |
| सरकारी रोख्यांत वगैरे | ... | रु. ७०,६५५ |

बँकिंगसंबंधीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. बँकेचीं तिमाही सांपत्तिक पत्रकें कायद्यानुसार सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध केलीं जातात. ठेवीच्या व्याजाचे दरासंबंधीं व विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

के. जी. राणे — ऑफि. मॅनेजर.
नारायणराव हणमंतराव साळुंखे — प्रेसिडेंट, दि कोल्हापूर अर्बन को. बँक लि.

# दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ६९,१२०-०-० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०१,०५०-०-० | रुपये |
| खेळतें भांडवल | ८,३७,०००-०-० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा.—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

# शेतकऱ्यांना हवामान-खात्याचें सहाय्य

( डॉ. एल. ए. रामदास, पीएच. डी., शेतकी हवामानतज्ज्ञ, ह्यांच्या "इंडिअन फार्मिंग" च्या जुलै महिन्याच्या अंकांतील लेखाचा डॉ. मो. वा. चिपळोणकर, डी. एस्सी. यांनीं केलेला अनुवाद. )

" जें शेतकऱ्याला अवगत असतें पण ज्याचें त्याला वर्णन करतां येत नाहीं तें शेतकी हवामानशास्त्र " असें सर नेपिअर शॉ ह्यांनीं त्यासंबंधीं लिहितांना म्हटलें आहे. एकीकडे हवामानशास्त्रज्ञ शेतकऱ्याला कशा प्रकारची मदत करूं शकेल हें सांगणें व उलट-पक्षीं शेतकऱ्याच्या नेमक्या गरजा कोणत्या त्या हवामानशास्त्रज्ञाला सांगणें हें त्या दोघांना जोडणारा दुवा ह्या नात्यानें, शेतकी हवामानतज्ज्ञाचें काम होय. असल्या मध्यस्थी कामाचा पहिला भाग म्हणजे शेतकऱ्याकडून अगर त्याच्या वतीनें बोलणाऱ्या शेतकीखात्याच्या अधिकाऱ्याकडून त्याच्या शेतीसाठीं नक्की कोणत्या प्रकारच्या हवामानाची माहिती व त्याबद्दलच्या कोणत्या आगाऊ सूचना नेहमीं लागतात त्यासंबंधीं माहिती गोळा करणें हा होय. ह्यासाठीं प्रस्तुत लेखकानें हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतील व संस्थानांतील शेतकीखात्याच्या अधिकाऱ्यांना एक विस्तृत प्रश्नपत्रिका पाठवून त्यांचीं उत्तरें गोळा केलीं आहेत. त्यासंबंधींची कांहीं माहिती पुढें दिली आहे.

### प्रश्नपत्रिका

(१) जमिनीच्या पहिल्या नांगरणीचा काल व प्रकार कोणता ?

(२) पीक कालव्याच्या पाण्यावरील आहे किंवा कसें ?

(३) पेरणीची वेळ कोणती ?

(४) लावणीची ( भाताच्या पिकाप्रमाणें ) वेळ कोणती ?

(५) अंकुर फुटून वाढीचा पहिला काळ अदमासें कोणत्या दिवसापासून कोणत्या दिवसापर्यंत असतो ?

(६) साधारणपणें कोणत्या दिवसांत पिकाची वाढ झपाट्यानें होते, व त्यास पूर्णावस्था केव्हां येते ?

(७) रोपाला फूल कधीं धरतें ?

(८) रोपाला दाणा येऊन त्याची वाढ साधारणपणें कोणत्या दिवसांत होते ?

(९) पिकाची कापणी केव्हां करतात ?

(१०) कापणीनंतर वाळण्यासाठीं किती दिवस तें उघड्यावर पडून राहतें ?

(११) चांगलें पीक येण्यास नेहमींच्या हवामानाचा अनुक्रम कशा प्रकारचा असावा लागतो तें द्या. तसेंच पिकासाठीं सर्वांत उत्तम परिस्थिति, वेळोवेळीं लागणाऱ्या पावसाचें प्रमाण, उष्णतामान, दमटपणा, वारा, मळभ येणें इत्यादींसंबंधीं माहिती द्या.

(१२) वाढीच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या अवस्थांमध्यें जास्तींत जास्त किती पाऊस एका दिवसांत पडला तरी पिकावर फारसा वाईट परिणाम होत नाहीं तें सांगा.

(१३) किती दिवस जास्त पाऊस पडत राहिला तरी पिकाची नासाडी होत नाहीं हें पिकाच्या तीन अवस्थांना अनुलक्षून निरनिराळें सांगा.

(१४) अवर्षणाचा जास्तींत जास्त किती काळ गेला तरी पिकावर फारसा अनिष्ट परिणाम होत नाहीं ? हें तीन अवस्थांना निरनिराळें सांगा.

( १५ ) वर्षाच्या कोणत्या महिन्यांत पाऊस पडला तर तो भलत्याच वेळीं पडला असें मानलें जाईल ? ह्या महिन्यांत कमींत-कमी पाऊस किती पडला तर तो पिकाला मारक होईल ?

(१६) थंडी-( अ ) पिकाला कमींतकमी उष्णतामान कोणतें सहन होतें कीं ज्याहून कमी झालें तर तें त्याला नक्की बाधक होतें ?

( ब ) कोणत्या महिन्यांत थंड द्रवामुळें ( गार लागल्यामुळें ) पिकाचें नुकसान होतें ?

(१७) उन्हाळा-( अ ) जास्तींत जास्त उष्णतामान कोणतें कीं ज्याहून जास्त झाल्यास तें पिकाला नक्की अपायकारक होतें ?

( ब ) कोणत्या महिन्यांत अशी उष्णता होते ?

(१८) वारा-कोणत्या महिन्यांत सोसाट्याच्या वाऱ्यांनीं शेतांतील उभीं पिकें पडण्याची भीति असते ? उभ्या पिकांना वाऱ्याचा जास्तींत जास्त वेग किती सहन होतो ?

(१९) अभ्राच्छादित आकाशामुळें नेमक्या कोणत्या दिवसांत पिकाला बाध येऊं शकतो ?

(२०) तुमच्या प्रांतांत गारांच्या वर्षावामुळें कोणत्या महिन्यांत पिकावर अनिष्ट परिणाम होऊं शकतो ? व हें अशा महिन्यांतून किती वेळां होतें ?

(२१) कोणत्या महत्त्वाच्या रोगामुळें पिकावर अनिष्ट परिणाम होतो ? पिकाची वाढ होत असतांना कोणत्या हवेमुळें असे रोग जास्त पसरण्याचा संभव असतो ?

(२२) पिकाचा नाश करणाऱ्या कीटकांच्या मुख्य सांथी कोणत्या ? असल्या कीटकांच्या वाढीला व त्यापासून पिकाला उपद्रव होण्यास कशा प्रकारची हवा लागते व ती कोणत्या महिन्यांत पडण्याचा जास्त संभव असतो ?

(२३) या विषयासंबंधीं इतर कोणतीहि माहिती असल्यास ती येथें द्यावी.

वरील प्रश्नपत्रिकेला निरनिराळ्या प्रांतांतील व संस्थानांतील शेतकी अधिकाऱ्यांनीं धाडलेल्या उत्तरांमध्यें मुख्य मुख्य पिकांसंबंधीं खूपच माहिती भरलेली आहे. जिल्हेवार मिळालेल्या या माहितीस आणखी पुष्टि म्हणून सरकारी प्रायोगिक शेतावर तेथील प्रयोगांत आलेल्या निरनिराळ्या पिकांसंबंधीं मिळालेली जास्त अचुक माहिती गोळा केली जात आहे; आणि जरूर लागेल तसतशी निरनिराळ्या जिल्हाधिकाऱ्यांकडूनही अशा प्रकारची माहिती मिळविली जाणार आहे.

आजपर्यंत मिळालेलीं उत्तरें बारकाईनें तपासलीं जात आहेत. बहुतेक सर्व उत्तरें अत्यंत उपयोगी असलीं तरी क्वचित् बाबतींत असें म्हणावेंसें वाटतें कीं, " शेतकी हवामान शास्त्र याचें शेतकऱ्यासच काय पण शेतकी अधिकाऱ्याला सुद्धां वर्णन करतां येत नाहीं ! " अर्थात् या उत्तरांत सांठविलेली जी माहिती आहे ती शेतकी अधिकाऱ्याच्या आजच्या शेतकीविषयक ज्ञानाची निदर्शक होय.

### हवामान व पिकें

आगामी हवामान कशा प्रकारचें असेल हें जर शेतकऱ्याला आधींच कळलें तर त्याचा खूपच फायदा होईल ह्याबद्दल मुळींच संशय नाहीं. उदाहरणार्थ, पावसाळा केव्हां सुरू होईल व सबंद पावसाळ्यांत दर दिवशीं पावसाचें मान कसकसें बदलत जाईल, केव्हां उघाड पडेल व परत केव्हां पावसाळी हवा सुरू होईल इत्यादि जर त्याला वेळींच ( आगाऊ ) कळतील तर तो त्या

मानानें आपलीं निरनिराळीं मशागतीचीं कामें (म्हणजे पेरणीसाठी वाफे तयार करणें, खत देणें, पेरणी करणें, तण काढणें, लावणी करणें, कापणी करणें, वाळवणें, घोपटणें इ. इ.) पिकाला कमींत कमी बाध येईल व शेती जास्तींत जास्त किफायतशीर होईल अशा रीतीनें बरोबर वेळा साधून करूं शकेल. तसेंच, त्याच्या तुटपुंज्या मजुरीचा, खताचा व पाण्याचा व्यय जास्तींत जास्त फायद्या होईल अशा तऱ्हेनें तो करूं शकेल.

प्रत्येक पिकाच्या बाबतींत पेरणीपासून तों कापणी होऊन पीक पूर्णपणें हातांत पडेपर्यंतच्या काळांत कांहीं विशेष महत्त्वाचे क्षण असतात. खुद्द पेरणीची वेळ सुद्धा शेतकऱ्याला कांहीं कमी काळजीची असते असें नव्हे. कारण पेरणी झाल्याबरोबर जर पावसाच्या जोराच्या सरी आल्या तर सर्वच बीं वाहून जाण्याचा संभव असतो; किंवा पेरणी होऊन नुकत्या अंकुर फुटलेल्या शेताची सुद्धा त्यामुळें भयंकर नासाडी होते. तसेंच पेरणी झाल्यावर फार दिवस जर उघाड पडली तर उलट कोरड्या हवेमुळें पहिलें बीं करपून जातें व फिरून दुसरी पेरणी सुद्धा करावी लागते इत्यादि सर्व गोष्टींची त्याला पूर्ण जाणीव असते. म्हणून पेरणीच्या वेळीं असलेल्या हवामानावरून पिकाची प्रत, जात, व त्याचे दर, एकरीं प्रमाण इत्यादि गोष्टी प्रथमच ठरून जातात. पेरणी होणें, अंकुर फुटणें व पालवी येणें येथपर्यंतच्या म्हणजे पिकाच्या प्रथमावस्थेंत जर सर्व गोष्टी ठीक असल्या तर त्याला चांगलाच मुहूर्त लाभला असें म्हणावयास मुळीच हरकत नाहीं. त्यानंतर पिकाच्या दुसऱ्या अवस्थेंत (म्हणजे पालवी फुटून शेतें जोमांत वाढणें) तण काढणें व इतर मामुली कामासाठी मधून मधून उघाडीची फार आवश्यकता असते. याच अवस्थेंत पिकाची वाढ झपाट्यानें व जोरदार होत असल्याकारणानें मुबलक पाणी व सूर्यप्रकाश यांची फार गरज असते. यापुढची तिसरी अवस्था म्हणजे ज्यावेळीं रोपट्यांना फुलें येऊन दाणा धरला जातो ती होय. या अवस्थेंत अभ्रें येणें हें पिकाच्या दृष्टीनें फार वाईट असतें. ज्यावेळीं कणिस फुटून कोवळे दाणे बनूं लागतात त्यावेळीं ते फार नाजूक असल्यामुळें त्यांना गरम वारा सुद्धा सहन होत नाहीं; कारण त्यानें लगेच दाणे सुकून जातात. सबंद ऋतु चांगला जाऊन जरी कापणीची वेळ आली असली तरी प्रतिकूल हवामान केव्हांही धोक्याचेंच, कारण अशावेळींसुद्धा गारा किंवा पावसाची एखादी जोराची सर पिकाची अनन्वित नासाडी करूं शकते. आगाऊ धोक्याची सूचना मिळणें म्हणजे आधींपासूनचीच योग्य तयारी असण्यासारखें होय. म्हणून पाऊस येईल अशी नुसती शंका आली कीं अनुभवी शेतकरी तेव्हांच कापणीची घाई करतो. असेरपर्यंत, म्हणजे कापणी होऊन खळ्यावर आलेल्या धान्याला, अचानक येणाऱ्या पावसाच्या एकट्या दुकट्या सरीची सुद्धा भीति असतेच.


पिकाची खराबी करणारे कीटक व कीड यांची वाढ विवक्षित हवामानावरच अवलंबून असते, आणि त्यांना तशी अनुकूल परिस्थिति मिळाल्यास पिकाच्या रोगाचा प्रसार फार लवकर होऊं शकतो. यांतच आणखी रोपट्यांचे रोग आणि टोळधाड यांचा समावेश केला म्हणजे शेतकऱ्याचे शत्रू किती आहेत याची पूर्ण कल्पना करतां येईल.

### हवामानावर आधारलेलें शेतकी वेळापत्रक

निरनिराळ्या प्रदेशांत कोणत्या पिकाला कोणतें हवामान लागतें, व त्याचे विशेष महत्त्वाचे काल कोणते हें त्या पिकावर आणि त्या प्रदेशावर अवलंबून असतें. शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांनीं दिलेल्या माहितीवरून आणि ठिकठिकाणच्या आज माहीत असलेल्या हवामानावरून शेतकी हवामानशास्त्रज्ञ वेगवेगळ्या पिकांसाठी हवामानावर आधारलेलीं शेतकी वेळापत्रकें करण्याच्या खटपटींत आहेत. तसें झाल्यास त्याचा उपयोग पुढें हवामानाचें भविष्य वर्तवणाऱ्या हिंदुस्थानांतील सात हवामान-केंद्रांच्या अधिकाऱ्यांना होईल. हीं सात केंद्रें मुंबई, कराची, लाहोर, दिल्ली, नागपूर, कलकत्ता व मद्रास या शहरीं आहेत.

## शेतकी हवामानाचें वेळापत्रक

प्रान्तः- मद्रास. जिल्हाः- सेलम. पीकः- भात (कालव्यावरील).




आकृति १ ली

अर्थात् आज तयार केलेलीं वेळापत्रकें हीं तात्पुरतीं व त्या दिशेनें सुरुवात करण्यासाठींच आहेत. जसजसा अनुभव येईल तसतसे त्यांत फेरफार करावे लागतील. येथें उदाहरणादाखल असल्या वेळापत्रकांपैकीं एक चित्ररूपानें आकृति १ मध्यें दिलें आहे. तें मद्रास इलाख्यांतील सेलम जिल्ह्यांतील कालव्याच्या पाण्यावरील माताच्या पिकाचें होय. आगामी हवामानाचें अनुमान ठरवणाऱ्या अधिकाऱ्याला असल्या आकृतीवरून कोणत्या भागांतील, कोणत्या पिकाकरितां, कोणत्या वेळीं, कोणती माहिती आधी दिली पाहिजे हें चटकन् ध्यानांत येईल. अशा तऱ्हेनें हवामानशास्त्रज्ञ शेतकऱ्याच्या म्हणजे त्याच्या पिकाच्या गरजा लक्षांत घेऊन आपलीं पत्रकें व धोक्याच्या सूचना जाहीर करीत जाईल.

आज प्रत्येक शेतकरी आपआपल्या बुद्धीप्रमाणें आगामी हवामानासंबंधीं अंदाज करतो व त्या कारणानें सहाजिकच जवळजवळच्या शेतांमध्येंसुद्धां मशागतीचीं मुख्य मुख्य कामें निरनिराळ्या वेळीं केलेलीं दिसतात. पण यापुढें शेतकरी जसजसा हवामानासंबंधीं रोज ताज्या बातम्या ऐकूं लागेल तसतसा तो त्याबरहुकूम ( त्या अंदाजाला धरून ) आपलीं कामें करूं लागेल; आणि अशा तऱ्हेनें थोड्याच वर्षांत सर्व शेतकऱ्यांचीं निरनिराळीं मशागतीचीं कामें हवामानांतील फरकानुसार व अर्थात् पूर्वीपेक्षां जास्त सयुक्तिक ( मनाला पटणारीं ) अशीं होऊं लागतील.

### शेतकऱ्यासाठीं हवामानासंबंधीं बातम्या

सर्व लोकांसाठी हवामानासंबंधींचे अधिकृत अंदाज वर म्हटलेल्या निरनिराळ्या सात् प्रांतिक केंद्रांतून व शिवाय अलाहाबाद, आणि पेशावर येथून रेडिओद्वारां प्रसिद्ध केले जाणार आहेत. त्याचप्रमाणें ऑल इंडिया रेडिओचीं आणखी इतर केंद्रें असल्याकारणानें शेतकऱ्यांसाठी सर्व प्रांतांतील हवामानासंबंधींच्या बातम्या, भूमिजनांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून तेथून रोज प्रसृत केल्या जातील. या बातम्यांचा उत्तम तऱ्हेनें व वेळेवर प्रसार करण्यासाटी म्हणून हिंदुस्थानांतील सर्व खेड्यापाड्यांतून ठेवण्यासाठी अनेक रेडिओंची ( ग्राहक यंत्रांची ) आवश्यकता आहे. कारण हवामानासारख्या व इतरही बातम्या सर्व भूमिजनांना देण्याचा हाच एक सर्वांत उत्तम मार्ग होय.

### हवामानासंबंधींच्या पत्रकांचें व अंदाजांचें स्वरूप

हिंदुस्थानचें हवामानखातें शेतकऱ्यांना किती व कोणत्या प्रकारची मदत करूं शकतें हें सगळ्यांना समजण्यासाठी मुद्दाम एक पुस्तक तयार केलें गेलें असून तें लवकरच प्रसिद्ध होणार आहे. हवामान खात्याचीं पत्रकें वाचतांना कांहीं गोष्टी मुद्दाम लक्षांत ठेविल्या पाहिजेत, त्या अशाः—

( अ ) देशांतील निरनिराळ्या भागांतील हवामानाच्या सारखे सारखेपणामध्यें अगर सलगपणामध्यें ( Homogeneity ) बराच फरक असतो. उदाहरणार्थ, पावसाच्या बाबतींत, कोणत्याही एका पावसाळी हवेच्या कालावधींत एका भागापेक्षा दुसऱ्या भागांत पडणाऱ्या पावसाची वेळ व स्थळ हीं दोन्हीं अगदीं भिन्न असूं शकतात. जसें सिंध, राजपुताना या भागांत एखाद्या विवक्षित दिवशीं जवळ जवळच्या ठिकाणीं पर्जन्यमानांत आढळणारा फरक कोंकण-मलबार किंवा बंगाल या भागांतील तशा ठिकाणांच्या फरकापेक्षा जास्त असेल. म्हणून पावसाळी हवा याचा अर्थ असल्या दोन भागांकरितां एकच धरतां येणार नाहीं.

( ब ) या शास्त्राच्या आजच्या स्थितींत रोजच्या हवामानाच्या नकाशावरून आगामी हवामानाचें, साधारणपणें ३६ ते ४८ तासांपर्यंतचेंच अनुमान करतां येतें व वातचक्रें, वादळें यांसारख्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या घडामोडींबद्दल फार तर ४८ ते ७२ तास आगाऊ सूचना देतां येते. पुढेंमागें सर्वसाधारण हवामानाचा अंदाज एक आठवड्यापुरतासुद्धां देणें शक्य होईल. पण त्याला अजून जास्त संशोधनाची जरूरी आहे. हिंदुस्थानचें हवामानखातें लवकरच ही गोष्ट हातीं घेणार आहे.

( क ) वीज, वादळें व गारांचा पाऊस यासारख्या घडामोडी कधीं कधीं फारच तुरळक व अधेंमधेंच होतात. त्यामुळें सहाजिकच त्यांचें नक्की ठिकाण व वेळ आधीं वर्तवणें नेहमी शक्य होत नाहीं. त्यांच्या बाबतींत ती घडून येण्याची शक्यता विवक्षित स्थळाऐवजीं अदमासांनीं त्याच्या आसपासच्या मोठ्या प्रदेशापुरती फक्त दर्शवितां येते.

शेतकऱ्यांसाठी हवामानासंबंधींचीं पत्रकें व आगाऊ सूचना प्रसिद्ध करण्याचा प्रश्न आज प्रथमच हातीं घेतला जात आहे. यापूर्वी एवढा मोठा प्रयत्न कधींच केला गेला नव्हता. जेव्हां हवामानशास्त्रज्ञ व शेतकरी एकमेकांशीं पूर्णपणें समरस होतील तेव्हांच यांतून चांगल्या गोष्टींची निष्पत्ति होऊं शकेल; आणि म्हणूनच हिंदुस्थानचें हवामान खातेंहि येथील शेतकऱ्याला मदत करण्याची ही एक सुसंधि आहे अशा दृष्टीनें या प्रश्नाकडे बघत आहे.

---

### मुंबई प्रांतांत दुसरें सरकारी इंजिनिअरिंग कॉलेज

मुंबई प्रांतांत सध्या एकच इंजिनिअरिंग कॉलेज आहे. इंजिनिअरांस येत असलेल्या वाढत्या मागणीचा विचार करून प्रांतिक सरकारनें दुसरें कॉलेज स्थापण्याचें ठरवलें आहे. तें अहमदाबादेस काढण्यांत येणार आहे आणि त्या बाबतींतली योजना तयार करण्यासाठीं एक सल्लागार समिती लवकर नेमली जाईल.

### मुंबईस कानडाचा गहू मिळणार

कॅनडाहून ९०,५०० टन गहू येत असून तो केवळ मुंबईच्या उपयोगासाठी देण्यांत यावयाचा आहे.

### हिंदी कपाशीखालील क्षेत्राचा अंदाज

गत सालाच्या मानानें चालू हंगामांतील हिंदी कपाशीचें क्षेत्र १२ टक्के कमी भरेल असा अधिकृत अंदाज आहे.




DAMODARDAS BHAGWANDAS

INDIA'S LEADING AGARBATTI MANUFACTURERS

High Quality Products

( Finest in the Market )

*761, Raviwar Peth, Poona 2.*

## अमेरिकेचे उधार–उसनवारीचे (लॅंड–लीज) प्रचंड व्यवहार

अमेरिका युद्धांत पडण्यापूर्वी आणि पडल्यानंतरहि त्या राष्ट्रास इंग्लंड, रशिया व चीन ह्या देशांस युद्धसामुग्रीचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर करीत रहाणें प्राप्त होतें. इंग्लंडला कच्चा माल आणि खाद्य पदार्थ नेहमीच परदेशांतून आयात करून नित्याच्या जीवनाची गरज भागवावी लागते. युद्धपरिस्थितींत ह्या बाबतींत त्या देशास अमेरिकेवर अधिकच अवलंबून रहावें लागलें. रशियाची उत्पादनशक्ति मोठी असली तरी त्यासहि जर्मन हल्ल्यास यशस्वी रीतीनें तोंड देण्यासाठी अमेरिकेच्या सहायाचें महत्त्व बऱ्याच काळपर्यंत तीव्रतेनें भासलें. चीनला तर स्वतःच्या लढाऊ साधनांच्या तुटपुंज्या पुरवठ्यामुळें अमेरिका व इंग्लंड यांच्या तोंडाकडे सहाय्यार्थ पहात रहाण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. तथापि अमेरिकेचें आर्थिक सामर्थ्य इतकें प्रचंड आहे कीं त्या राष्ट्रानें युद्धाबाबतची सर्व गरज भागवून मित्र राष्ट्रांस लढाऊ सामानाचा पुरवठा उदार हातांनीं केला. प्रारंभीं अमेरिकेनें पुरवलेल्या मालाची किंमत इंग्लंडनें रोखीनें दिली आणि स्वतःच्या अमेरिकेंत गुंतवलेल्या भांडवलाचा मोबदलाहि दिला. पण या पद्धतीनें मालाचे पैसे देणें इंग्लंड व रशिया ह्यांस शक्य नव्हतें आणि जर्मनी व जपान यांच्याशीं युद्ध जणूं काय भागीदारीचें युद्ध अमेरिकेस चालवणें आवश्यक होतें. मित्र राष्ट्रांवर कर्जाचा जबर बोजाहि त्यास टाकतां येईना. त्या अडचणींतून मार्ग म्हणून अमेरिकेनें उधार–उसनवारीची व्यवस्था अमलांत आणली. ऋणको देशांनीं माल सवडीनें परत करावा असा तिचा अर्थ होता आणि त्यांत व्याजाचा प्रश्न नव्हता. तरीहि अमेरिकेच्या माल उसनवारीनें देण्याच्या शक्तीसही मर्यादा असल्यानें युरोपांतील युद्ध संपतांच हा व्यवहार पूर्वी ठरल्याप्रमाणें बंद झाला. तथापि, युद्ध समाप्त झालें तरी त्याच्या परिस्थितीचें शेपूट राहिलेंच आणि रोख पैसे टाकून किंवा कर्ज काढून अमेरिकन माल घेण्याची इंग्लंडची तयारी नव्हती. त्या कारणानें इंग्लंडची तारांबळ उडाली आणि अत्यंत आवश्यक असलेल्या अमेरिकन मालाची किंमत कशी द्यावयाची हा गंभीर प्रश्न उद्भवून त्यासंबंधांत वाटाघाटीस तात्काळ प्रारंभ झाला. उसनवारीनें अमेरिकेकडून घेतलेला माल परत केव्हां व कसा व्हावयाचा किंवा त्याच्या किंमतीची भरपाई कशी व किती मुदतीनें करावयाची हा पुढचा प्रश्न आहेच. बुद्धींत युद्धखर्च म्हणून उसनवारीचें येणें हिशेबांतून अमेरिकेनें काढून टाकावें अशी सूचनाहि पुढें आली आहे. मित्रराष्ट्रांचें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीच अमेरिकेच्या बरोबरीनें इंग्लंड व रशिया ह्या देशांनीं उसनवारीनें घेतलेल्या मालाचा विनियोग केला असल्यानें असा हिशेब केला जाणें योग्य व इष्ट आहे असा युक्तिवाद तिच्या मुळाशीं आहे. जगाची आर्थिक घडी पुन्हां नीट बसण्यासाठी आणि अमेरिकेच्या स्वतःच्या हिताचे दृष्टीनेंहि त्याचें समर्थन केलें जात आहे. युद्धकाळांतला मालपुरवठा निराळा आणि युद्धसमाप्तीनंतरचा व्यापारी व्यवहार निराळा आणि आतां इंग्लंडनें अमेरिकेकडून घेतलेल्या मालाची किंमत देण्याची व्यापारी पद्धतीच अवलंबणें सरळ आहे असें अमेरिकन लोकांचें म्हणणें आहे. निरनिराळ्या युद्धक्षेत्रांत अमेरिकेसहि उसनवारीनेंच इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, हिंदुस्थान इत्यादि देशांनीं माल पुरवलेला आहे आणि हिशेबांत त्याची वजावाट अर्थातच होईल. अमेरिकेनें किती किंमतीचा व कोणता माल उसना दिला ह्याची माहिती बोधप्रद होण्यासारखी असल्यानें ती पुढें दिली आहे:–

### उसनवार आणि उलट–उसनवार

| उसनवार | (दशलक्ष डॉलर) | उलट उसनवार | (दशलक्ष डॉलर) |
|---|---|---|---|
| दारूगोळा व जहाजें | २०,६९१·६ | इमारती वगैरेचा | |
| पेट्रोलियम | २,१९४·७ | भांडवली खर्च | १,१९५·८ |
| कारखान्यांत बन- | | अन्न व कापड | ४८९·४ |
| लेला माल | ८,६५७·७ | पेट्रोलियम, कोळसा | १,२०९·४ |
| शेतीचा माल | ५,९०६·५ | लष्करी सामुग्री | १,३०७·४ |
| जहाजें व इतर | ४,५८०·३ | जहाजें, वहातूक | १,०३२·६ |
| | | इतर | २०६·१ |
| | | कच्चा माल व अन्न यांची अमेरिकेकडे निर्यात | १६५·७ |
| एकूण | ४२,०२०·८ | एकूण | ५,६००·४ |

### देशांमधील वांटणी

| देशाचें नांव | उसनवार (दशलक्ष डॉलर) | उलट उसनवार (दशलक्ष डॉलर) |
|---|---|---|
| इंग्लंड | १३,४९८·७ | ३,७९६·९ |
| ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड | १,३७८·७ | ९८०·३ |
| हिंदुस्थान | } २,२३१·४ | ६१६·७ |
| चीन | | ३·७ |
| रशिया | ९,१२८·९ | २·१ |
| लॅटिन अमेरिका | २४५·४ | ... |
| फ्रेंच साम्राज्य | } ४,८८७ | २७२·० |
| बेल्जम " | | २६·१ |
| इतर देश " | | २·६ |
| एकूण | २१,३६८·९* | ५,६००·४ |

* १०,६५१·८ दश लक्ष डॉलर्सची सामुग्री विशिष्ट देशांस अशी पुरवली नसल्यानें ती त्या आकड्यांतून वगळली आहे.

ऋणको देशांनीं उलट उसनवारीनें पुरवलेला माल वजा जातां सुमारें ३,६०० कोटि डॉलर्सची म्हणजे अजमासें १२,००० कोटी रुपये किंमतीची युद्धसामुग्री अमेरिकेनें मित्र राष्ट्रांस पुरवली आहे. ती परत येण्याचें अखेरीस कांहीं होवो, युद्धसमाप्तीनंतरचे आयात–निर्गतीचे व्यवहार व्यापारी देण्याघेण्याच्या पद्धतीनें झाले पाहिजेत असा आग्रह अमेरिकेनें धरणें स्वाभाविक आहे. अमेरिकेंतून येणाऱ्या मालाची किंमत इंग्लंडनें त्या देशांत अल्प व्याजाच्या दरानें कर्ज काढून भरावी अशी सूचना हा व्यवहार सौकर्यानें व्हावा अशा हेतूनें करण्यांत आली आहे.

### आभार

*ह्या अंक प्रसिद्ध करण्यांत सहाय्य करणारांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. जाहिरातींसाठी जागा आगाऊ राखून ठेवण्याविषयीं विनंति करण्यांत आली होतीच. उशीरां हातीं आलेल्या कित्येक जाहिरातींस, पृष्ठें वाढवूनहि, जागा मिळूं शकली नाहीं ह्याबद्दल दिलगिरी वाटते. त्याबद्दल स्वतंत्र व्यक्तिशः खुलाशाचीं पत्रें पाठविण्यांत आलीं आहेत.*

—व्यवस्थापक

## इंग्लंडची परराष्ट्रांतली प्राप्ति घटली

आंतरराष्ट्रीय व्यापार मूलतः आणि व्यवहारतः मालाच्या ऐन जिनसी देण्या-घेण्याच्या स्वरूपाचा असतो. त्यांत आयात व निर्गत होणाऱ्या मालाच्या किंमतीची वजावाट होऊन बाकी निघाल्यास तिची भरपाई सोनें किंवा कर्जे ह्यांच्या मार्गानें होत असते. आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याच्या आढाव्यांत ऐन जिनसी मालाशिवाय एका देशानें दुसऱ्याकरितां केलेल्या कामाचाहि अंतर्भाव होतो. ह्या अडचणीची घटना देशाच्या नैसर्गिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीवर अवलंबून राहते. उदाहरणार्थ, युद्धापूर्वी हिंदुस्थान ऋणको देश होता. त्यानें इंग्लंडमध्यें काढलेल्या कर्जाचें व्याज, ब्रिटिश नोकरांचीं पेन्शनें, ब्रिटिश व्यापारी व औद्योगिक मंडळ्यांचे नफे ह्यांची भरपाई प्रतिवर्षी करावी लागत असे, आणि ती मालाच्या निर्गतीच्या स्वरूपांत होत असे. ह्या देशाच्या निर्गत व्यापाराची किंमत आयात व्यापाराच्या किंमतीपेक्षा अधिक असे आणि ह्या फरकांतून परराष्ट्रीय देणें भागवलें जाई. परराष्ट्रांतून येणाऱ्या मालाचा मोबदला त्याच्या किंमतीचा माल निर्गत करून द्यावा लागून अदृश्य देणीं चुकतीं होण्यास त्यांच्या किंमतीचा आणखी माल धनको राष्ट्रांकडे पाठवला जात असे. ही स्थिति आतां बदलली असून इंग्लंडलाच हिंदुस्थानचें देणें झालें आहे. लंडनमध्यें काढलेल्या हिंदी कर्जाची पूर्ण फेड होऊन तेथें साठलेल्या हिंदी शिलका हिंदुस्थानला परत देण्याचा अवघड प्रश्न इंग्लंडपुढें उभा आहे.

ब्रिटिश लोकांनीं दुसऱ्या देशांस कर्जे दिलीं होतीं आणि त्यांमध्यें स्वतःचें भांडवल गुंतवलें होतें. तसेंच, त्यांचा बँकिंग, विमा व समुद्रावरील जहाजांची वहातुक ह्यांचेसंबंधांतील धंदा सर्व जगभर मोठ्या प्रमाणावर चालून त्यांतील फायद्याचें येणें मोठें निघत असे. ह्या सर्व बाबतींत दुसरे देश इंग्लंडचे ऋणको बनले होते आणि आपल्या देण्याची फेड ते ग्रेट ब्रिटनला आवश्यक असलेला कच्चा माल व खाद्य पदार्थ पाठवून करीत. इंग्लंडला लागणाऱ्या अन्नाचा पुरवठा ह्या रीतीनें मोठ्या प्रमाणांत बाहेरून होई आणि ब्रिटिश राष्ट्राच्या व्यापारी आढाव्यांत ह्या परदेशीय येण्यास महत्त्वाचें स्थान असे. ही स्थिति आतां पालटली आहे आणि सदरहु येण्यांत मोठी घट होऊन स्वतःचें आर्थिक बस्तान नीट बसवण्यासाठी इंग्लंडला आपला निर्गत व्यापार वाढवून त्याच्या मोबदल्यांत आवश्यक मालाची आयात होण्याची तरतूद करणें प्राप्त झालें आहे. परराष्ट्रांच्या लंडनमधील स्टर्लिंग शिलकांचा निकाल लावण्याची निकड आणि अमेरिकन मालाच्या आयातीचें अगत्य व त्यासंबंधांत चाललेल्या प्रदीर्घ वाटाघाटी ह्या सर्व अडचणीच्या गोष्टी इंग्लंडच्या बदललेल्या आर्थिक घटनेचीं लक्षणें आहेत. इंग्लंडचें ५,००० कोटि रुपयांचें भांडवल पूर्वी परदेशांत गुंतलें होतें आणि त्याचें व्याज व फायदा मालाच्या आयातीच्या स्वरूपांत ब्रिटिशांच्या घरीं चालून येत असे. ही प्राप्ति आतां पुष्कळच घटली आहे आणि असल्या इतर देण्यांतहि घट झाली आहे. ह्या इंग्लंडच्या वार्षिक येण्याचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत, त्यांवरून नवीन परिस्थितीवर प्रकाश पडण्यासारखा आहे.

**इंग्लंडची परराष्ट्रांतील प्राप्ति**

**( दशलक्ष पौंड )**

| प्राप्तीचा उगम | १९३७ | १९३८ | युद्धोत्तर स्थिति |
|---|---|---|---|
| गुंतविलेलें भांडवल | २१० | २०० | १०० |
| जहाजांची वहातुक | १३० | १०० | ७५ |
| व्याज व कमिशन | ४० | ३५ | २५ |
| इतर | १० | ... | २० |
| एकूण | ३९० | ३३५ | २२० |

परदेशांत मालाची निर्गत वाढवणें, साम्राज्यांतर्गत सवलतीच्या व्यापाराची व्यवस्था दृढ करणें इत्यादि उपायांनीं स्वतःची आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय आर्थिक स्थिति सुधारण्याची धडपड इंग्लंड करीत आहे आणि त्याबाबतींत त्याची अमेरिकेशीं स्पर्धा होत आहे. ह्याचें वर्म वरील आकड्यांवरून सूचित होईल.

अत्यंत गुणकारी—
कामगार ब्राह्मी तेल
व
माधव गोकुल हेअर ऑईल वापरा.
म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.

एक हजार रुपये
दर वर्षी रुपये एकशें चाळीस प्रमाणें फक्त पांच वर्षे हप्ते देऊन, म्हणजे एकंदर रुपये सातशें फक्त भरून
एक हजार रुपये
रकमेचा विमा ( नफ्यासह ) घेतां येईल.
विमा हप्त्यादाखल भरलेल्या रकमेवर इनकम टॅक्स माफ होतो.
—तपशील मागवा—
दि ट्रस्ट ऑफ इंडिया
अश्युअरन्स कं. लि., पुणें.
अध्यक्षः—श्रीमंत जगन्नाथ महाराज पंडीत
मॅनेजरः—व्ही. एच. देशमुख, बी. ए.
शाखाः—मुंबई, नागपूर, सोलापूर, बेळगांव इ.

## हिंदी व्यापाराच्या विस्तारास उत्कृष्ट संधि

### जपानच्यात बाजारपेठा हस्तगत करा

चाळीस वर्षांमागें रशियाचा पराभव करून पूर्व एशियांत आपलें आर्थिक व राजकीय वर्चस्व स्थापण्यास जपाननें प्रारंभ केला. आधुनिक पद्धतीचे कारखाने आणि व्यापार ह्यांचा विस्तार पाश्चात्य राष्ट्रांच्या धर्तीवर त्यानें केला आणि पूर्वेकडील इंग्लंड बनण्याची महत्त्वाकांक्षा त्यानें मनांत धरली. पूर्व एशियांत शांतता रहावी ह्या हेतूनें इंग्लंडनें जपानशीं मित्रत्वाचे व्यापारी तह व करार केले, त्यांचा त्या देशानें आपले हातपाय पसरण्यासाठीं पूर्ण उपयोग करून घेतला. विविध प्रकारचा स्वस्त माल खपण्यास दरिद्री हिंदुस्थानांत पुष्कळ वाव आहे हें ओळखून जपाननें त्या तऱ्हेचे अनेक जिन्नस इकडे पाठवण्याचा क्रम आरंभला आणि जपानची स्पर्धा येथील बाजारांत जाणवूं लागली. हिंदुस्थानचा कापूस स्वदेशीं नेऊन त्याचें बनवलेलें कापड इकडे पाठवण्यांत आणि हिंदी गिरण्यांशीं स्पर्धा करण्यांत जपाननें वाढतें यश संपादलें. हिंदुस्थानांत आखुड धाग्याच्या कापसाची पैदास मोठ्या प्रमाणांत होते. तो पिकवणाऱ्या हिंदी शेतकऱ्यांचें आर्थिक जीवन जपानच्या मुठींत गेलें. हिंदी कापसास येथील गिरण्यांत पुरी मागणी न आल्यानें आणि त्याचा उठाव हवा तसा इतरत्र न होऊं शकल्यानें तो जपानलाच विकणें प्राप्त झालें. तुमचा कापूस आम्ही घेतों, पण आमचें कापड तुम्हीं घेतलें पाहिजे असा पेंच जपाननें हिंदुस्थानास घातला. जपानी कापडाची स्पर्धा हिंदी गिरण्यांस नको होती, आणि आपला कापूस तर हिंदुस्थानास जपानमध्यें खपवणें अगत्याचें होतें. ह्या अडचणीमधून मार्ग काढण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें जपानशीं व्यापारी करार करून ह्या देशानें घ्यावयाचें जपानी कापड आणि जपाननें घ्यावयाचा हिंदी कापूस ह्यांचें परस्पर प्रमाण ठरवून टाकलें.

त्या कराराचा गैरवाजवी फायदा घेण्यास जपाननें मागें पुढें पाहिलें नाहीं. करारांत आयात व्हावयाच्या कापडाची लांबी नमूद होती, रुंदी ठरली नव्हती. तेव्हां त्याची रुंदी वाढवून कापडाच्या एकूण आयातींत भर घालण्यांत आली. कापडाचे तुकडे व तयार कपडे पाठवण्यांत येऊं लागले. कृत्रिम रेशमाचा करारांत उल्लेख नव्हता म्हणून त्याच्या कापडाची आयात अधिक होऊं लागली. जपानच्या वर्चस्वाखालील उत्तर चीनमधील गिरण्यांत तयार झालेलें कापडहि जपानकडून येऊं लागलें. नाना प्रकारांच्या इतर जपानी मालाचीहि आयात त्याचबरोबर होऊं लागून त्यांचे संबंधांतील येथील धंद्यांस स्पर्धा जाचक झाली. हिंदुस्थानची जपानला होणारी निर्गत मात्र कापूस, ताग, लोखंड अशा थोड्या जातींच्या मालास मर्यादित होऊन राहिली. येथून तीस लक्ष गाठी कापूस (बहुतेक आखूड धाग्याचा) परदेशीं जात असे त्यांतला निम्म्याच्यावर एकट्या जपानला निर्गत होई. इकडून त्या देशास जाणाऱ्या मालाच्या किंमतीपेक्षां त्या देशांतून येणाऱ्या मालाची किंमत क्रमाक्रमानें अधिक होऊन हिंदी कपाशीच्या पिकाचा किफायतशीरपणा सर्वस्वी जपानच्या मिऱ्हाइकीवर अवलंबून राहिला. हिंद-जपान व्यापाराच्या ओघांत हें परिवर्तन कसें घडून आलें ह्याची कल्पना पुढें दिलेले एतत्संबंधीं तुलनात्मक आकडे देतील.

**युद्धापूर्वीचा हिंद-जपान व्यापार**
**( कोटि रुपये )**

| वर्ष | जपानी मालाची आयात | हिंदी मालाची जपानला निर्गत | आयातीपेक्षां निर्गत अधिक (+) निर्गत कमी (−) |
|---|---|---|---|
| १९३४–३५ | २०·८ | २४·५ | +३·७ |
| १९३५–३६ | २१·८ | २१·८ | +०·०५ |
| १९३६–३७ | २१·२ | ३०·० | +४·४ |
| १९३७–३८ | २२·१ | १८·१ | −४·० |
| १९३८–३९ | १५·४ | १४·५ | −०·८ |
| १९३९–४० | १९·२ | १४·१ | −५·१ |
| १९४०–४१ | २१·५ | ९·१ | −१२·३ |
| १९४१–४२ | ११·७ | ४·७ | −७·० |

जपाननें चीनशीं युद्ध चालू केल्यामुळें १९३७–३८ च्या नंतर त्या देशाचा माल इकडे कमी येऊं लागला. पण त्यापेक्षां फार मोठ्या प्रमाणांत हिंदी मालाची जपानला होणारी निर्गत घटली ही वरील आकड्यांवरून स्पष्ट होत असलेली गोष्ट येथें लक्षांत ठेवली पाहिजे. ज्यांची किंमत प्रत्येकीं दहा लक्ष रुपयांपेक्षा अधिक आहे अशा ३४ प्रकारांच्या जिनसा जपानी मालाच्या आयातीचे यादींत दाखल होत्या. कापसाचें कापड, लोकरीचा माल, रेशीम, काच, चिनी मातीचें सामान, विजेची सामुग्री, मुलांचीं खेळणीं इत्यादि अनेक वस्तु जपान ह्या देशांत पाठवीत असे आणि त्यांची देशी मालाशीं तीव्र स्पर्धा होई. आतां त्या जपानी मालाची आयात बंद झाली आहे आणि त्या तऱ्हांचे जिन्नस हिंदुस्थानांत बनवण्याची सुसंधि प्राप्त झाली आहे. एवढेंच नव्हे तर पूर्व व पश्चिम एशियांतील अनेक देशांत जपानी माल कित्येक वर्षे पूर्वीप्रमाणें खपवला जाणार नाहीं आणि त्याची जागा हिंदुस्थानांत बनलेल्या मालास घेतां येण्यासारखी आहे. हिंदुस्थान सरकार आणि हिंदी कारखानदार व व्यापारी ह्यांनीं ह्या बाजारपेठांची पहाणी करून आपला माल जेथें जेथें खपवतां येईल तेथें तेथें तो पाठवण्याची व्यवस्था पद्धतशीर रीतीनें करणें अगत्याचें आहे. ह्या सर्व लहानमोठ्या देशांत आर्थिक पुनर्घटना होणें अपरिहार्य असून त्यांच्याशीं होणाऱ्या व्यापाराची घडी पुन्हां नीट बसवली जाईल. ह्या व्यवस्थेंत हिंदुस्थाननें आपला योग्य वाटा घेतला पाहिजे. कारण त्या कामींहि आंतरराष्ट्रीय स्पर्धा होणें अपेक्षितच आहे आणि प्रत्येक राष्ट्रानें आपापल्या हिताची जोपासना करणें स्वाभाविक व इष्ट आहे. युद्धकाळांत हिंदुस्थानमध्यें कित्येक नवीन उद्योगधंदे निघाले आहेत, त्यांच्या मालासहि ह्या परराष्ट्रीय व्यापारांत कोणतें स्थान आहे ह्याचा निर्णय करून त्यासंबंधांत विधायक धोरण आखण्याची ही वेळ आहे. ह्या बाबतींत सरकार, धंदेवाले व व्यापारी ह्यांचें पूर्ण सहकार्य झाल्यावांचून मात्र इष्ट हेतु साध्य व्हावयाचा नाहीं.

### क्विनीनचा तुटवडा

मार्च, १९४३ अखेर हिंदुस्थान सरकारच्या जवळचा क्विनीनचा साठा १,८९,००० पौंड इतका होता, तो १९४४ मार्च अखेर १,७१,००० पौंड झाला. युद्धपूर्व काळांत ह्या देशांत प्रतिवर्षीं २,१०,००० पौंड इतकें क्विनीन खपत असे, आणि त्याचें येथील वार्षिक उत्पादन ९०,००० पौंड असे. क्विनीनचा तुटवडा भरून काढण्यासाठीं सरकारनें बंगाल व मद्रास प्रांतांत रशियन पद्धतीची सिंकोनाची लागवड चालू केली आणि तिनें लवकरच २,४०० एकरांचें क्षेत्र व्यापलें. आणखी १,१०० एकरांची भर त्यांत टाकण्यांत येत असून ह्या क्विनीनच्या उत्पादनाचें पहिलें फळ १९४६ सालाच्या अखेरीस हातीं येईल.

## हिंदी लोकांस अमेरिकन नागरिकत्वाची सवलत

### मनोरंजक मुद्दे

हिंदी लोकांस अमेरिकेंत राहून तेथील नागरिकत्व संपादन करण्यास बंदी आहे ती उठून विशिष्ट मर्यादेंत तें दार खुलें करण्याच्या हेतूनें पुढें आणलेल्या कायद्याचा मसुदा अमेरिकन हाऊस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हजमध्यें मंजूर झाला आहे. हिंदुस्थानची युद्धांतली वर्णनीय कामगिरी आणि ह्या देशाशीं व्यापार वाढवण्यांत होणारा अमेरिकेचा फायदा ह्या गोष्टी प्रस्तुत बदललेल्या मनोवृत्तीच्या व धोरणाच्या मुळाशीं आहेत. त्याचे पुरस्कर्ते आणि विरोधक ह्यांनीं केलेल्या भाषणांत आलेले मुद्दे मनोरंजक असल्यानें ते त्रोटक रीतीनें आम्ही येथें देत आहों :—

मि. एव्हेरेस्ट डिक्सन—हिंदुस्थानांत अमेरिकन व्यापार वाढविण्यास पुष्कळ वाव आहे. तो देश आज नाहीं उद्यां स्वतंत्र होणार आणि त्याची गि-हाइकी अमेरिकेस महत्त्वाची ठरेल.

मि. सॅम्युअल डिकस्टाइन—बिलास अमेरिकन सरकारचाच नव्हे तर ब्रिटिश सरकारचाहि पाठिंबा आहे.

मि. ॲडॉल्फ सॅबाथ—हिंदी लोकांस अमेरिकेंत कमीपणानें लेखण्यांत येत नाहीं ह्याचा पुरावा पुढें मांडण्यांत आपला फायदा आहे.

मि. मेसन—मार्शल स्टालिन एशियांत रशियाचें वर्चस्व स्थापूं पहात आहे. हिंदुस्थान व चीन ह्या देशांशीं व्यापार वाढवून अमेरिकेनें त्यास पायबंद घालणें आवश्यक आहे. कम्युनिस्ट हस्तक रशियाभर अमेरिकेचें वजन कमी करूं पहात आहेत. हिंदुस्थान व चीन देशांस यंत्रसामुग्री हवी आहे ती त्यांच्या मालाच्या मोबदल्यांत मोठ्या प्रमाणावर अमेरिकेस पुरवतां येईल, ह्या दृष्टीनें पहातां नवीन बिल अत्यंत उपयुक्त आहे.

मि. मॅकगॉवन—अमेरिकन नागरिकत्वाच्या रक्षणासाठीं घातलेल्या निर्बंधांची तटबंदी अभेद्य राहिली पाहिजे. नाहींतर परकीयांच्या पुरानें अमेरिका वाहून जाईल. जपानला दिलेल्या सहाय्याचें बक्षिस काय मिळालें ? पर्ल हार्बरवर हल्ला !

मिसेस क्लेअरबूथ लूस—हिंदुस्थानचें युद्धसहाय्य बाजूस ठेवलें तरी आणि स्टर्लिंग शिलकांची किल्ली इंग्लंडनें स्वतःच्या हातीं ठेवली असली तरी त्या देशाच्या व्यापारांत अमेरिकेस हिस्सा मिळेल. शिवाय वर्णभेदाचा आरोप रशिया केल्यावांचून रहाणार नाहीं. त्यास जागा देतां कामा नये.

मि. इमॅन्युअल सेलर—हिंदुस्थाननें वीस लक्ष सैन्य उभें केलें. प्रसंगीं तें दीड कोटीपर्यंत जाऊं शकलें असतें. इंग्लंडशीं व्यापारी करार अमेरिका करूं पहात आहे. प्रस्तुत बिल नामंजूर झाल्यास त्यासाठीं अनुकूल वातावरण निर्माण होणार नाहीं.

मि. फ्रेडरिक स्मिथ—श्री. जे. आर. डी. टाटा हे कम्युनिस्टांचे शिरोमणि आहेत. श्री. ए. डी. श्रॉफ व सर आर्देशीर दलाल त्याच वर्गांत आहेत. (त्यांच्या "मुंबई योजने"तले कांहीं उतारे वक्ते वाचून दाखवतात.)

मि. लिऑनार्ड ॲलन—इंग्लंडला हिंदुस्थानला सहाय्य व्यावयास नको आहे आणि अमेरिकेकडून परस्पर काम करून घ्यावयाचें आहे. आपणांस हिंदी व्यापार कांहीं मिळणार नाहीं. हिंदुस्थानास मी मदत देण्यास तयार आहें. त्यासाठीं अमेरिकेनें हिंदूंस बायबल शिकवण्याकरितां मिशनरी त्या देशास पाठवावे !

मि. चार्लस लॉ फॉलेट—मि. टाटासारख्या भांडवलवाल्यांस कम्युनिस्ट बनवणें हास्यास्पद आहे. बिलाविरुद्ध अप्रस्तुत विघानें करणें गैर आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

**शेतकऱ्यांची प्रांतिक बँक**

म्हणजेच

**बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड**

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११

—मुख्य कचेरी—

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बेंक हाऊस लेन, कोट मुंबई.

शाखा ४९

खेळतें भांडवल

रु. ५,७५,००,०००

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. एल. मेहता
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि मिरज स्टेट बँक लि.

**—मिरज—**

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. २,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १,००,००० |
| प्रत्येक शेअरचे रु. २०० प्रमाणें वसूल झालेलें | ... | रु. १०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. २,५०,०००चे वर |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ६१,००,०००चे वर |

डायरेक्टर्स

१ रावसा. वि. पां. बेडेकर, बी. एस्सी. बी. ई. (चेअरमन)
२ डॉ. कृ. गो. गोसावी, एल्. सी. पी. एस्.
३ रावसा. वि. स. आपटे, बी. ए., एलएल्. बी.
४ श्री. गो. वि. सखदेव
५ श्री. ब. ग. आगाशे

शाखा

- लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
- मोडनिंब व कुर्डूवाडी ( जि. सोलापूर )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

के. डी. शिराळकर
मॅनेजर.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें

| अधिकृत भाण्डवल | विक्रीस काढलेलें व खपलेलें |
|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. २५,००,००० |

वसूल झालेलें रु. १२,५०,०००
रिझर्व्ह व इतर फंड रु. २,७०,०००
एकूण खेळतें भाण्डवल रु. १,४०,००,००० चे वर

★ बँकेच्या शेअर्सवरील डिव्हिडंडमध्यें क्रमशः वाढ होत आहे.

★ गतवर्षी शें. ४½ + ½ टके डिव्हिडंड देण्यांत आलें.

—ःशाखाः—

डेक्कन जिमखाना, खडकी, गिरगांव, मुंबई ( फोर्ट ), जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, फैजपूर ( पे–ऑफिस )

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर



फलटण दरबारकडून पुरस्कृत असलेली

## श्रीलक्ष्मी सें. को. बँक लि., फलटण

( स्थापना १–२–१९२६ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. २,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... ... | रु. १,४५,२५० |
| वसूल भांडवल | ... ... | रु. ६१,१७० |
| फंड | ... ... | रु. १,०६,३६२ |
| ठेवी | ... ... | रु. १७,३७,१५३ |
| खेळतें भांडवल | ... ... | रु. १९,०४,६८२ |

ठेवी—चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात.
कर्ज—जोडलेल्या सहकारी पतपेढ्या व बँकेचे भागीदार यांना सर्व प्रकारच्या तारणावर कर्ज, कॅशक्रेडिट, ओव्हरड्राफ्ट वगैरे मिळतो.
विमा—हल्ली वेस्टर्न इंडिया, नेपच्यून, एशियन व कॉमनवेल्थ या कंपन्यांचे स्वीकारण्यांत येतात.
इतर—सर्व प्रकारचे बँकांचे व्यवहार होतात.

- ही बँक फलटण दरबार, दि फलटण शुगर वर्क्स लि., व सर्व स्थानिक संस्था यांची बँकर्स आहे.

**★ ही दिपवाळी ★**
बँकेच्या सर्व हितचिंतकांना भाग्याची व आनंदाची होवो.

| | |
|---|---|
| श्री. ह. तळवलकर | वि. शं. झिरपे |
| मॅनेजर. | बी. ए., एलएल्. बी., वकील, |
| फलटण, दि. १५।१०।४५ | चेअरमन. |



## दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कं. लि.

मतदानाचा हक्क बजावणें हें सूज्ञ नागरिकांचें आद्य कर्तव्य. पण हें जरी खरें असलें तरी आपल्या प्रेमानेंच वाढणाऱ्या स्वतःच्या कुटुंबाच्या भावी संरक्षणाचा हक्क तितकाच किंवहुना आर्थिक महत्त्वाचा नाहीं काय? विम्याच्या रूपानें आपल्या प्रिय जनांची सोय करणें क्रमप्राप्तच आहे. त्यांत आपणांस विविध मार्गदर्शन करण्यास योजनांनीं युक्त अशी विमेदारांची व अल्पावधींत विमाक्षेत्रांत प्रसिद्धीस आलेली विमा संस्था आपल्या सेवेस तयार आहे.

८६६ सदाशिव पेठ, पुणें नं. २

व. न. म्हैसूर
एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर.

## सरकारी योजनांचें दुष्काळी स्वरूप

( लेखकः—प्रा. इ. गो. कर्वे, एम्. ए. )

युद्धविषयक कामगिऱ्यांत गुंतलेले लाखों लोक आतां बेकार होत आहेत. त्यांना निदान कांहीं दिवस तरी रोजगार मिळावा ह्याकरतां सरकार ज्या योजना आंखीत आहे त्यांचें आर्थिक-दृष्ट्या थोडें पृथक्करण करणें जरूर आहे. कोणीकडून तरी उपाशास रोजमुरा देणें किंवा बेकारास कामाला लावणें एवढ्या-पुरतेंच ह्या योजनांचें उद्दिष्ट असतां कामा नये. अशा तुटपुंज्या अगर घाईनें केलेल्या योजनांत पैशाचा अपव्यय मात्र होतो. शिवाय, जर ह्या योजनांमुळें सध्यांच्या भावानें परदेशी यंत्र-सामुग्री व माल आणण्याची सरकारला जरूर उत्पन्न होत असेल तर त्या योजनांचा वास्तविक फायदा येथील लोकांना होण्याऐवजीं विलायतेंतील कारखानदार व मजूर ह्यांसच व्हावयाचा. गेल्या महायुद्धानंतर असा अनुभव आपल्याला आलेला आहे, आणि आज राष्ट्रीय सरकार अस्तित्वांत नसल्यानें पुन्हां दोन-तीन वर्षांच्या संक्रमण कालांत सरकारतर्फे भारी खर्चाच्या परंतु बिन-हिशेबी अनेक योजना लोकांच्या गळयांत पडण्याची भीति आहे.

तसेंच, पैसा खर्च करावयाचा तोही अशा तऱ्हेनें करावा कीं त्यापासून येथील उद्योगधंद्यांच्या कार्यक्षमतेंत कायमची भर पडावी. उदाहरणार्थ, आगगाड्यांची वाढ अगर अद्ययावत् यांत्रिक साधनें ह्यांचा व्यवहारांत प्रसार ही गोष्ट कितीही इष्ट असली तरी भांड-वलाचा खर्च होतो त्या मानानें किफायतशीरपणांत किंवा रोज-गारांत वाढ होत नाहीं. त्यापेक्षां कालवे आणि पाणीपुरवठ्याच्या इतर योजना ह्यांवर अधिक लक्ष्य दिल्यास शेतीच्या धंद्याचा कायमचा फायदा होण्यासारखा आहे. जी गोष्ट आगगाड्यांची तीच रस्त्यांची. सध्यांहून अधिक चांगले आणि अनेक रस्ते पाहि-जेत हें खरें, पण कोणते रस्ते करावे आणि ते कोणत्या प्रकारचे असावे हें ठरवितांना खर्च आणि किफायतशीर उपयोग ह्यांची सांगड घातली पाहिजे. शिवाय, देशाच्या प्रत्येक भागांत स्थानिक माल कोणता उपलब्ध आहे हेंहि पाहिलें पाहिजे. सीमेंट अगर डांबर ह्यांचा उपयोग ज्या भागांत करणें जरूर आहे तेथेंच तो केला पाहिजे. नाहींतर ह्या वस्तूंच्या व्यापाऱ्यांच्या भलावणीमुळें निष्कारण खर्चाच्या योजना अवलंबिल्या जाऊन स्थानिक धंदे-वाल्यांच्या पोटावर पाय येणार आहे.

बेकारी निवारणार्थ सरकार ज्या योजना अंगिकारणार त्यांचें स्वरूप खाजगी व हिशेबी योजनांस पूरक असावें; मारक ठरूं नये. शेतकी, कारखाने, वहातुक, बांधकाम इत्यादि क्षेत्रांत खाजगी धंदेवाल्यांपुढें ज्या योजना आहेत त्यांच्या मार्गांत अडथळा न आणतां, आणि जरूर तेथें त्यांस न्याय्य मदत करून देशाच्या नित्याच्या आर्थिक प्रगतीस सरकारनें हातभार लावला पाहिजे. तसें न करतां उलट नवें भांडवल उभारणें, परदेशांहून यंत्रसामुग्री व इतर साधनें आणविणें, वहातुक नेहमींसारखी अनियंत्रित करणें आणि करांचा बोजा आगामी आर्थिक परिस्थिति ध्यानांत घेऊन कमी करणें ह्या बाबतींत अवास्तव नियंत्रणाचें किंवा प्रति-कूल धोरण सरकारनें स्वीकारल्यास देशाच्या आर्थिक प्रगतीस अडथळा उत्पन्न होईल, एवढेंच नव्हे तर बेकारी निवारणाच्या दृष्टीनेंहि सरकारकडून पुरेशी कामगिरी होणार नाहीं.

हिंदुस्थान सरकारचे आर्थिक प्रगति खात्याचे मंत्रि सर आर्दे-शीर दलाल ह्यांस खाजगी धंद्यांच्या अधिकांत अधिक विस्ताराचें धोरण मान्य आहे असें त्यांच्या अलीकडील भाषणांवरून दिसतें. परंतु त्यांचेच सहकारी फडणवीस व वहातुक मंत्री ह्यांचें त्यांस कितपत सहाय्य मिळतें तें भांडवलाची उभारणी, उत्पादन साध-नांची आयात व वहातुकीवरील निर्बंधांचा शेवट आणि करांमध्यें सवलती ह्या बाबतींत येत्या सहामाहींत कोणतें धोरण अंगिकारिलें जातें त्यावरून ठरणार आहे.


**The Bank of Kolhapur, Ltd., Kolhapur.**

(Incorporated in Kolhapur, in 1926, the liability of the members being limited.)

Under the Patronage of and largely supported by the Government of H. H. the Chhatrapati Maharaja of Kolhapur.

| | |
|---|---|
| Capital Authorised ... | Rs. 10,06,500/- |
| Capital Issued and Subscribed... | Rs. 5,06,500/- |
| Capital Called and Paid up ... | Rs. 2,02,600/- |
| Reserve Fund ... | Rs. 2,85,000/- |
| Working Funds about ... | Rs. 200,00,000/- |

Head Office :—Kolhapur.

Branches : (1) Inchalkaranji (S. M. C.) (2) Jayasingpur (S. M. C.) (3) Malkapur (Kolhapur State) (4) Peth Vadagaon (Kolhapur State) (5) Kolhapur-Gujari Peth. (6) Kolhapur-Shahupuri Peth.

Current Deposit and Savings Bank Accounts opened, and Fixed Deposits received on terms which may be ascertained on application.

Cash Credits, Loans and Overdrafts :-The Bank grants accommodation against approved securities

Safe Deposit Vault at Kolhapur (H. O.). Rates on application. Banking business of every description transacted.

The present Share Capital is being increased as under:—

| | |
|---|---|
| Capital Authorised ... | Rs. 40,06,500/- |
| Capital Issued and Subscribed... | Rs. 20,06,500/- |
| Capital Called and Paid up ... | Rs. 10,03,250/- |

Permission of the Kolhapur Government and of the Central Government of India is being obtained for the issue of New Shares.

*Manager.*



**पैसे गुंतवण्यास योग्य स्थान व संधि**

श्री. राजेसाहेब मिरज ज्युनिअर

यांचे आश्रयाखालील

**कृष्णा शुगर मिल्स लि.**

कित्तूर, व्हाया कुडची एम. एस. एम.

स्थापना १९४१ इ.

**साखर उत्पादनाचें काम दोन वर्षां-पासून सुरू होऊन लौकरच डिस्टि-लरीचें कामही सुरू होईल.**

मुदतीच्या ठेवी खालील दरानें घेतल्या जातात

| १ वर्ष | २ वर्षे | ३ वर्षे |
|---|---|---|
| द. द. ४ | द. द. ५ | द. द. ६ |

मॅनेजिंग एजंट्स

विंचूरकर आणि कंपनी

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

हेड ऑफिसः–प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें
मुंबई शाखाः–इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

| | |
|---|---|
| अधिकृत विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ४,५८,६४० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ४५,००,००० |

बँकेनें गतवर्षी करमाफ ४ टक्के डिव्हिडंड वाटलें आहे.

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष | श्री. द्रा. ग. बापट, उपाध्यक्ष

दि कॉमनवेल्थ अॅश्युअरन्स कं. लि. पुणें, दि सुप्रीम म्युच्युअल अॅशुअरन्स कं. लि. पुणें व हिंद बेनिफिट प्रॉव्हिडंट इन्शुरन्स सोसायटी लि. मुंबई.

या कंपन्यांचे हप्ते घेतले जातात.

मद्रास, सोलापूर, नगर, बेळगांव, अहमदाबाद, मिरज, सांगली, कोल्हापूर, हुबळी, धारवाड व मुंबई वगैरे ठिकाणीं ड्राफ्टस दिले जातात.

गो. घों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.) बी. कॉम., एलएल. बी. मॅनेजर

चिं. त्रिं. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बँक ऑफ औंध लिमिटेड.

( औंध संस्थानांत नियमित जबाबदारीची म्हणून स्थापन झालेली )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल .... ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २,५०,००० |
| खपलेले व भरणा झालेलें .. | रु. १,४०,७०० |
| खेळतें भांडवल ... | रु. १२,००,००० |

मुख्य कचेरी : औंध

—शाखा—

आटपाडी, विचूद आर. एस. | कुंडल, ओगलेवाडी

संचालक मंडळ

श्री. ना. रामप्पा बाळाप्पा बिद्री, बी. ए., एलएल. बी. पंतप्रधान, औंध संस्थान
श्रीमंत ना. युवराज बापूसाहेब पंत, चीफ सेक्रेटरी, औंध संस्थान
श्री. ना. सखाराम भिमण्णा शेटे, व्यापारी दिवंची
श्री. शंतनुराव लक्ष्मणराव किर्लोस्कर, डे. जनरल मॅनेजर, मे. किर्लोस्कर बंधु, लि. किर्लोस्करवाडी
श्री. माधवदास रामदास देवी, व्यापारी औंध
श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर, औंध.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

ही दिपवाळी आमचे विमेदार, भागीदार, एजंट व हितचिंतक यांना सुखदायी व आनंदाची जावो.

# दि इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर

चेअरमनः—प्रि. व्ही. के. जोग, एम. ए. | सेक्रेटरीः— अ. ना. गाडगीळ

★

आपण दीर्घायुषी आहांत अशी आपली खात्री आहे ना? मग आमचे कंपनीची धनार्जन विमा पॉलिसी घेणें आपणांस निश्चित आवडेल.

हप्ता वार्षिक रु. ६०–१५ ते ७४–७ प्रमाणें फक्त २० वर्षे भरल्यास

रु. १००० पश्चात् व रु. ४५०० हयातींत मिळण्याची सोय

★

—लिहा अगर भेटा—

आर. जी. फाटक, ४२८ नारायण पेठ, पुणें शहर. | अ. ना. गाडगीळ, सेक्रेटरी.

# दिवाळी

ही मानसिक समाधानाचें दृश्य प्रतीक असते

◆ मानसिक समाधान विवंचना दूर झाल्यानें मिळतें. कुटुंबाच्या भवितव्याची व उतार वयांतील अडचणीची काळजी ही प्रत्येक तरुणास असते. या अडचणीचें निवारण झालें म्हणजे कुटुंबांत दिपवाळीच्या आनंदाची प्रभा प्रज्वलित होते.

आपला विमा

औंध म्युच्युअल

विमा कंपनींत उतरा व समाधानाचा प्रदीप पाजळा.

आमच्या विमेदारांस व हितचिंतकांस दिपवाळी सुखाची जावो.

मॅनेजिंग डायरेक्टर,
दि औंध म्युच्युअल लाइफ अॅश्युरन्स सोसायटी लि., पुणें २.

## "वैद्यराज, अगोदर आपली प्रकृति सुधारा"

### पाश्चात्य राष्ट्रांचा उपदेश व वागणूक

( लेखक:— श्री. व. बि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम, )

जीं राष्ट्रें जेते म्हणून जर्मनी व जपान यांना वाहवलेले म्हणून त्यांच्या आचारविचारांत आमूलाग्र 'सुधारणा' घडवून आणण्याकरितां बसलीं आहेत त्यांना स्वतःच्या आचारविचारांत प्रथम सुधारणा करा म्हणून बजावण्याची वेळ आलेली आहे. भयंकर संहारक अस्त्रांच्या दमांत बाकीच्या जगास कावूंत ठेवण्याची या विजयी राष्ट्रांची मनीषा उघड करून दाखविण्याची जरूरी नाहीं. केवळ जर्मनीवर व जपानवर विजय मिळविला म्हणून आपण सर्वगुणश्रेष्ठ असें मानण्याकडे झालेली प्रवृत्ति भ्रममूलक आहे. नैतिक मूल्यें म्हणून कांहीं चीज आहे याचा इंग्लंडला काय इतर सर्व गोऱ्या राष्ट्रांना विसर पडलेला दिसतो. यावेळेस रस्किनसारखा माणूस असता तर त्यानें सर्व संहारक अस्त्रें निर्माण करणाऱ्या बुद्धिमान् शास्त्रज्ञांना खडखडीत सांगितलें असतें कीं, बाबांनों, तुमची सर्व हुशारी फोल आहे, इतकेंच नव्हे तर या सर्व जगाच्या नाशास ती कारणीभूत होणार आहे. यापेक्षां तुम्हीं शोध लावले नसतेत तरी जगावर मोठे उपकार झाले असते. शास्त्रज्ञांची बाजू घेऊन एकादा म्हणेल कीं शोधांनीं काय केलें ? आमच्या शोधांचा दुरुपयोग करा म्हणून कांहीं आम्ही सांगत नाहीं. त्याला उत्तर असें कीं तुमचे शोध लागताहेत केव्हां आणि आम्हीं त्यांचा दुसऱ्यांचा निःपात करण्याकरितां उपयोग करतो केव्हां याला जणूं तुमचे राज्यकर्ते टपून बसलेले असतात आणि तुम्हीं राजकर्त्यांच्या हातांखालील बाहुलीं बनून बसतां. तुमची संस्कृति इतकी कच्ची आहे कीं, शस्त्रसंभाराच्या मदांत तुमच्यांत असलेली किरकोळ माणुसकी केव्हांच नष्ट होऊन गेलेली आहे.

### वासनांना गवसणी

तिसऱ्या महायुद्धाच्या तडाख्यांतून जगाला वांचवावयाचें असेल तर प्रथम या विजयी राष्ट्रांनीं स्वतःचे आर्थिक विचार बदलले पाहिजेत. आपल्या गरजा म्हणजे चोजले, जितके वाढवावे तितके चांगले व ते पुरविण्याकरतां नाना तऱ्हेच्या वस्तू उत्पन्न करावयाच्या, सगळ्या जगाला तीच शिकवणूक द्यावयाची व त्याप्रमाणें उपभोग वाढला म्हणजे जग कृतार्थ झालें अशी सांगणारी पाश्चात्य अर्थविचारसरणी खणून काढण्यांत आली पाहिजे. न जातु कामः कामानाम् उपभोगेन शाम्यति। हविषा कृष्णवर्त्मैव भूय एवाभिवर्धते॥ ही आमच्या हिंदवी संस्कृतीची शिकवणूक पाश्चात्यांनीं अंगिकारली तरच त्यांचा तरणोपाय आहे. 'अनियंत्रित अर्थव्यवस्था', तिच्यानें घोटाळे उत्पन्न होतात म्हणून 'आर्थिक नियोजन' व त्यानेंहि श्रीमंतींत राहणें जमत नाहीं म्हणून साम्राज्यें आणि तीं मिळवण्याकरतां भयंकर युद्धें अशी ही पाश्चात्य राष्ट्रांची अर्थ नव्हे, अनर्थ परंपरा आहे. अतएव आपल्या वासनांना गवसणी घालण्याचें शिक्षण जनतेला द्या, भौतिक शास्त्रांचा उपयोग करून उत्पादन वाढवा व संपत्तीचें योग्य वांटप करा, वेगवान वाहनांचा उपयोग सर्व तऱ्हेचा दुष्काळ नाहींसा करण्याकडे करा, जगांतील रोगराई, अज्ञान हीं हटविण्याकरितांच ज्ञानाचा उपयोग आहे हें बिंबवून घ्या, हिंदुस्थान व चीन यांच्या तत्त्वज्ञानाकडे लक्ष द्या व त्यांच्या आध्यात्मिक विचारास मान देऊन ते आत्मसात् करा आणि साधी राहणी पत्करा असें विनय बाजूस ठेऊन पाश्चात्यांस स्पष्टपणें सांगणें भाग आहे.






सुंदर व रसिक स्त्रियांची निवड
Asha
आशा
सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.
( स्वतःचे डेपो : मुंबई–गोवा–बंगलोर–दिल्ली )
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिट्यूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
——कारखान्याच्या वाढीसाठीं ठेवी घेणें आहेत.——

बेकारीचा प्रश्न सोडवा
विमा कंपनीपेक्षां अभिनव योजना
सुशिक्षित स्त्री-पुरुषांसाठीं : फक्त ५०० रुपये भांडवल गुंतविणारे स्त्री, पुरुष पाहिजेत
द. म. १००/१५० रु. मिळवून देणारा एक नवीन उद्योग
म्हणजेच
फडके प्रॉडक्टस् आणि रेडसन् प्रॉडक्टस्‌ची एजन्सी घेणें
नवीन सुधारणा, नवीन सवलती, अखंड उद्योग वंशपरंपरेनें करा. नोकरीची जरूरी नाहीं. अर्ज पाठवा. आपल्या घरीं आपल्या गांवीं राहून उद्योग करा—
हरिभाऊ भंडारे
खाजाव डेपो, १४८८ शुक्रवार, पुणें

नोगीचें
डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४



व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

—: साठे बिस्किटें :—
ऑरेंज व श्रूसबरी
आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.
—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें.

विमा–काम–बक्षिसें
' सह्याद्रि ' प्रतिनिधींसाठीं बक्षिसांची अपूर्व योजना !
' सह्याद्रि ' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती ! !
एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.
–शाखा–
काळभोर आणि कं., पुणें.
अधिक माहितीसाठीं
लिहा अगर भेटा.
गो. ग. सौंदणकर
मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक.

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## अल्प बचतीच्या उत्तेजनार्थ मोहीम

आपल्या नित्याच्या खर्चांत बचत करून संसारांतील नेहमींच्या नडीअडीच्या प्रसंगीं उपयोगी पडावा म्हणून तो पैसा सुरक्षित रीतीनें बाजूस काढून ठेवण्याचें महत्त्व मध्यम व कनिष्ठ आर्थिक स्थितींतल्या जनतेस विशेष आहे. पोस्टांतील व बँकांतील ठेवी, आयुर्विम्याचे हप्ते, सरकारी कर्जरोख्यांत गुंतवण, सहकारी पद्धतीनें घरें विकत घेण्याची व्यवस्था इत्यादि मार्ग बचतीच्या सांठवणुकीसाठी उपयोगांत आणले जातात. परंतु समाजांतील ज्यांस बचतीची सवय अत्यंत आवश्यक व उपयुक्त असते त्या वर्गांस तिचें महत्त्व समजत नाहीं आणि जीवितांतल्या धोक्यांचे संबंधांत दूरदर्शीपणानें अगाऊ तरतूद करणें त्यांचे हातून घडत नाहीं. हा शिक्षणाचा आणि सवय लावण्याचा प्रश्न आहे आणि म्हणून सहकारी चळवळींत त्यावर विशेष कटाक्ष असतो. सामान्य जनतेस बचतीची सवय लावणें हा वस्तुतः सामाजिक प्रगतीच्या कार्याचा एक भाग समजण्यांत आला पाहिजे आणि त्याचें बाळकडू शाळांतून विद्यार्थ्यांस मिळालें पाहिजे.

### ढालींसाठी चढाओढ

बचतीचें आणि सरकारी कर्जरोख्यांतील तिच्या गुंतवणुकीचें अगत्य युद्धपरिस्थितींत तीव्रतेनें प्रत्ययास आलें. ह्या काळांत चलनाचा सारखा विस्तार होत गेला आणि अनेक लोकांच्या हातांत पूर्वीच्या मानानें अधिक पैसा खेळूं लागला. दुसऱ्या बाजूनें वस्तू दुर्मिळ झाल्या आणि भलत्या किंमती देऊन त्या विकत घेण्याची आवश्यकता व मोह ह्यांचा लोकांच्या मनावर पगडा बसला. चलनविस्तार आणि तज्जन्य महागाई ह्यांस आळा घालण्यासाठी लोकांच्या हातांत खेळणारा पैसा सरकारकडे परत जाण्याची आवश्यकता सहाजिकच उत्पन्न झाली. कर वाढवून आणि आपले कर्जरोखे खपवण्याचा प्रयत्न करून सरकारनें खेळतें चलन शोषून घेण्याचा प्रयत्न चालू ठेवला. इंग्लंडसारख्या देशांतहि बचतीच्या मोहिमा लोकांच्या पुढाऱ्यांनीं काढल्या आणि कोट्यवधि रुपये ह्या उपायानें सरकारी तिजोरीकडे खेचून घेतले. हिंदुस्थान सरकारासहि मध्यम व कनिष्ठ आर्थिक स्थितींतल्या लोकांमध्यें बचतीविषयीं प्रचार व प्रयत्न करण्याची आवश्यकता भासली आणि त्यानें ह्यासंबंधांत मोहीम चालू केली. उत्तेजनार्थ चढाओढ लावून जेथें बचत अधिक यशस्वी होईल, त्या विभागास ढाली नजर करण्याची योजना सरकारनें अमलांत आणली. १९४४-४५ सालांत दरमाणशीं मासिक बचतीची अधिकांत-अधिक सरासरीची रकम ज्या प्रांतांत किंवा संस्थानांत बचत केली जाईल त्या टापूच्या नांवानें सोन्याच्या ढाली बक्षिसार्थ व्हाइसरॉयांनीं देऊं केल्या आणि त्या प्रत्यक्ष अर्पण करण्याचा समारंभ गेल्या ऑगस्टमध्यें दिल्लींत व्हाइसरॉइज हाउसमध्यें लॉर्ड वेव्हल ह्यांचे हस्तें झाला.

### मासिक सरासरी बचत

सरासरीच्या मासिक बचतीची दरमाणशीं रकम साडेतीन आणे निश्चित करण्यांत आली होती. ह्या हिशेबानें जिंकलेली ढाल दिल्ली प्रांताच्या वाट्यास आली. त्याच्या सरासरीच्या बचतीचा आकडा दरमहा दरमाणशीं सुमारें १४ आणे म्हणजे ठरवलेल्या रकमेच्या चौपट भरला. त्या प्रांताच्या लोकसंख्येच्या मानानें निश्चित करण्यांत आलेल्या प्रमाणास धरून चोवीस लक्ष रुपये जमावयास हवे होते, पण सुमारें ९६ लक्ष प्रत्यक्ष गोळा झाले. ह्यामुळें अखिल भारतीय चढाओढींतली ढाल दिल्ली प्रांतानें मिळवली. मध्यवर्ती सरकाराच्या कारभाराखालील टापूंसाठी दुसरी ढाल होती, तीहि दिल्लीनेंच जिंकली. बंगलोर व राजकोट येथील क्षेत्रांचे बचतीचे आकडे दिल्लीच्या खालोखाल पडले आणि ते अनुक्रमानें १२·७ व ११·१ आणे असे होते. तिसरी ढाल केवळ संस्थानांचेसाठी होती आणि ती पोरबंदरला मिळाली. तेथील मासिक सरासरी ६·७ आणे होती. फरीदकोट व खैरपूर ह्यांचा नंबर त्याच्याखालीं लागला. चौथी ढाल केवळ प्रांतांच्यासाठी होती आणि त्यांच्या चढाओढींत सिंधनें ढाल जिंकली. सिंधच्या सरासरीची रकम २·९ आणे होती. त्याच्याखालीं मुंबईची २·३ आणे व पंजाबची १·६ आणे होती. व्हाइसरॉयांच्या सोनेरी ढालींशिवाय हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनीं १९४४-४५ सालीं प्रत्येक महिन्यांत कोणत्याहि प्रांतांत किंवा संस्थानांत अधिकांत अधिक दरमाणशीं बचत करण्याबाबत एक चांदीची ढाल बक्षिस म्हणून लावली होती. ती दिल्ली प्रांतानें तीन वेळां मिळवली.

### उपदेशाचें "ताकापुरतें रामायण"

युद्धाच्या विशिष्ट परिस्थितींत बचतीची खास खटपट सामान्य जनतेंत करण्यांत आली. ही परिस्थिति आतां बदलल्यानंतर आपल्या लहानमोठ्या प्राप्तीचा कांहीं अंश बाजूस काढून पुढें येणाऱ्या गरजांस व अडचणींस तोंड देतां यावें म्हणून तो पैसा सुरक्षितपणें गुंतवण्याची सवय सामान्य स्थितींतल्या लोकांस कायमची लागण्याची व्यवस्था केली जाणें अगत्याचें आहे. "सामाजिक आपत्तींपासून बचावा"च्या (स्पेशल सिक्यूरिटी) योजनांचा विचार इंग्लंडमध्यें झाला आहे त्याच्या मुळाशीं सरकारी प्रोत्साहन व सहाय आहे. प्रसिद्ध बीव्हरिज योजना ह्याच हेतूनें तयार करण्यांत आली आहे. तिच्या कर्त्यांनीं हिंदुस्थानांत येऊन ह्या देशांतील लोकांसाठी एखादी योजना आखण्याचे कामीं सल्ला द्यावा अशी सूचना करण्यांत आली होती. पण सर बुइल्यम बीव्हरिज ह्यांनीं आपणांस तसें करण्यास फुरसत होणार नाहीं असें कळवलें आहे. हिंदुस्थानच्या परिस्थितीस व गरजांस अनुसरून प्रस्तुत प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न होणें इष्ट आहे ह्याविषयीं दुमत होण्याचें कारण नाहीं. युद्धकालीन बचतीचा उपदेश युद्धोत्तर काळांत विसरला जाऊन त्याचें ताकापुरतें रामायण होणार नाहीं अशी खबरदारी मात्र घेण्यांत आली पाहिजे.


## पायोनियर डाईंग हाऊस, दातेवाडी, पुणें.

पक्क्या रंगाचीं कामें करून मिळतात.

रंगाची गॅरंटी हेंच आमचें ध्येय.

आमचे ग्राहकांस नवीन वर्ष सुखाचें जावो.

नूतन वर्षाभिनंदन

पुन्हां उत्साहित होण्यासाठीं—



भारत संतोष भुवनाची
सार्वत्रिक जनसेवा

भारत संतोष भुवन — ५६, स्लेटर रोड, फोन ४११६१२
बॉम्बे संतोष भुवन — फोर्ट मेन्स, डीन लेन, फोन ३०२१६
भारत संतोष भुवन — रोड स्टेशन समोर
संतोष बोर्डिंग (लॉज) — चर्नीरोड, गिरगांव, मुंबई नं. ४

संतोष म्हणजेच ... म्हणजेच संतोष

व्यवस्थापक :
—अरुरकर बंधु—

केवीरेकर काळी टूथ पावडर

दि कराड अर्बन को—ऑपरेटिव्ह
स्थापना १९१७ ] बँक लि., कराड. [ ३०-९-४५ अखेर

| | | |
|---|---|---|
| वसूल शेअर भांडवल | ... | ९८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | १,०४,००० |
| ठेवी | ... | १४,९६,००० |
| हातांतील व बँकेतील शिल्लक | | १,२४,००० |
| सरकारी कर्जरोख्यामध्यें | ... | ९,००,००० |
| कर्जें | ... | ६,५३,००० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

म. वि. खंडकर,
मॅनेजिंग डायरेक्टर

आमचा ५५ वर्षांचा अनुभव व विशेषता !

- १—दुष्प्राप्य औषधांचा संग्रह करण्यासाठीं संगठन आणि सुलभ साधन.
- २—जटिल व कठीण जडीबुटी व वनौषधी कुटून, दळून, चूर्ण विचूर्ण करणाऱ्या आद्यतम सामूहिक गोठवण.
- ३—सर्वोपरि परीक्षा परीक्षोत्तीर्ण अनुभवी एवं वयोवृद्ध वैद्यराज आणि अन्य सुयोग्य दक्ष निरीक्षकांचें निरीक्षण व सिद्धहस्त कामगारांची सोय.
- ४—पेटेन्ट आणि आयुर्वेदिक औषधें प्रचुर प्रमाणांत तयार होण्यानें स्वस्त व गुणकारी तयार होणें.
- ५—आमचें प्राचीन व प्रतिष्ठित नांव व प्रत्येक औषधाची शास्त्रोक्त क्रियाशुद्ध श्रेष्ठ आणि विशुद्ध होण्याची पूर्ण गॅरंटी आहे.

—परीक्षा करण्यासाठीं कॅटलॉग फुकट मागवा—

सुखसंचारक कंपनी लि., मथुरा.

सुखसंचारक बिल्डिंग : : : सुखसंचारक पोस्ट ऑफिस, मथुरा.

## शेअर बाजार

लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.

सरकारी कागदः—१९४३ सालापासून 'अर्था' मधून ३॥ टक्का कागद ९३–९४ होता तेव्हांपासून भरून ठेवण्यासंबंधीं वारंवार शिफारस केली होती. २२ आक्टोबर १९४५ रोजीं या रोख्यांचा भाव १०३–३ पर्यंत चढलेला आहे. ब्रिटिश व हिंदी सरकारचें युद्धोत्तर धोरण पैसा स्वस्त राखण्याकडे रहाणार हें निश्चित आहे. बेकारी टाळण्याला याच्याखेरीज उपाय नाहीं. नवे ३॥ टक्के रोखे सरकार १००–१ ला विकत असून नुकत्याच परत झालेल्या सुमारें ४० कोट रुपयांच्या १९४५–५५ च्या रोख्यांतून मोकळा झालेला पैसा बाजारांत आल्यानें त्यांना व इतर मुदतीच्या रोख्यांना मागणी चांगलीच आहे. या कारणांनीं ३॥ टक्का कागद अजूनही थोडा चढावयास वाव आहे असें म्हणण्यांत धोका वाटत नाहीं. न चढला तरी गुंतविणारांचें भाव घटण्यामुळें नुकसान होणार नाहीं असा विश्वास वाटतो.

टाटा स्टीलः—व्याज बाद झाल्यापासून टाटा शेअर वर चढून तारीख २२ आक्टोबरला २३२१—४ आणे व ४२५—८ आणे असे डिफर्ड व ऑर्डिनरी अनुक्रमें बंद राहिले होते. हे शेअर खरीदणें निश्चित धोक्याचें असून सटोडियांनीं तेजी तेजी म्हणून कितीहि रान उठविलें तरी ते घेण्याच्या फंदांत न पडणें श्रेयस्कर. ऑर्डिनरी ४०० च्या आसपास घ्यावयास ठीक आहेत. तसेंच डिफर्ड २१५० ला वाईट नाहींत. कंपनीच्या भांडवल वाढीच्या योजना अस्तित्वांत यावयास अजून नक्कीच कालावधि लागेल. तोंवर नुसत्या आशेवर आज घेणारांची फसगत होईल असें वाटतें. बेंगाल स्टील कंपनीच्या उत्पादनांत १९४६ पर्यंत शंभर टक्के वाढ होणार असल्यानें घेण्यास खरोखरीच चांगले वाटतात. पुढें व्याजही वाढणें खात्रीनें शक्य आहे, म्हणून तो ३३।८ पर्यंत घ्यायला हरकत नाहीं. मात्र चालू भावावर चालू व्याज अगदींच बेताचें सुटेल. इंडियन आयर्न यंदाच्या तुटपुंज्या व्याजामुळें ४१ च्या भावांत टाकाऊ आहेत.

गिरण्याः—यंदा सरसकट गिरण्यांचीं व्याजें १९४३ च्या मानानें सरासरी ४०।५० टक्के खालीं आलीं आहेत. हीं पुढील ३।४ वर्षें कायम रहाण्यासारखीं आहेत. तेव्हां चालू भाव पुरेपूर वाटतात. १५ रु. व्याजाला नागपूर ३९५, गोकाक ३०५, उस्मानशाही ३३०, सिंप्लेक्स १४ रु. ला २९५ व १२ रु. ला बार्किंगहॅम ३६३ यांत तुलना करून कोणाचे भाव किती वर खालीं यावेत हें पहाण्यासारखें आहे. चांगल्या गिरण्यांच्या भावावर ४॥ टक्के व्याज सुटत असेल तरच त्यांना हात लावणें बरें. नाहींतर थोडीफार भांडवली घट सोसावी लागेल. बहुतेक प्रसिद्ध गिरण्यांची ताळेबंदी मजबुती विशेष आहे त्यामुळें गुंतविणारांनीं लक्ष ठेऊन नेहमीचे प्रमुख शेअर जरूर उचलावेत. उत्तम व्यवस्था असलेले विष्णुसारखे शेअर कां हालत नाहींत याचें कारण गुंतविणारे बाहेर काढण्यास नाखूष असतात हें होय. या दृष्टीनें म्हैसूर व मिनर्व्हा लक्ष देण्याजोगे आहेत.

बँकाः—सरकारी रोख्यांच्या मजबुतीनें बँक शेअर्स सुद्धां टिकून राहतील. ते खालीं येण्याचा संभव विशेष वाटत नाहीं. बडोदा बँक वाढावयास हवा. नव्या युनायटेड कमर्शिअल संबंधानें 'अर्था'त सुरवातीसच शिफारस केली होती. त्यावेळेस घेतलेल्यांना ७०।७२ भाव पडून बँकेनें भांडवल वाढवितांना तितकेच शेअर ५० ला विकले. सरासरी ६२-६५ पडली. आज यांचा भाव ८० पर्यंत आहे. हा शेअर घेऊन तिजोरींत भरून ठेवलाच पाहिजे. पुत्रपौत्र धन्यवाद देतील. रिझर्व्ह बँक मात्र ५ टक्क्यापेक्षां जास्त मिळेल या कल्पनेनें १५३ ला घेणें म्हणजे श्रीमंतीचें प्रदर्शनच होय.

विमाः—सट्ट्याच्या भावांत कोठलाही विमा कंपनीचा शेअर मुळींच आकर्षक वाटत नाहीं. मर्कंटाईल ६० ला वाईट नाहीं.

इतरः—बेलापूरला उसापेक्षां धान्याकडे सरकारी सक्तीनें लक्ष देणें भाग पडल्यानें मंद दिवस आले आहेत. कंपनी ९ रु. व्याज देऊं शकेल किंवा नाहीं शंका वाटते. पण विकून टाकणें योग्य वाटत नाहीं. सिमेंट २१०-११ ला चांगला आहे. शिंयाची नुकतीच प्रसिद्ध झालेली माहिती कंपनी बरीच सुधारली असें दाखविते. पण ११ रु. व्याजाच्या मानानें सरकार सवतीसारखी वागणूक देत असल्यानें युद्धोत्तर परदेशी कंपनीच्या चढाओढीखालीं यांचा काय टिकाव लागेल या विचारानें शिंया ३७-३८ ला घेण्यासारखा नाहीं. केव्हां ना केव्हां बराच खालीं यावा. टाटा ऑईलची परिस्थिति उत्तम आहे. कंपनी २॥, २॥ व्याज कायम राखील असें दिसतें. तेव्हां ७० ला हा शेअर चांगला वाटतो.


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें

**नोटीस**

आमच्या बँकेंत कारकुनांच्या कांहीं नवीन जागा निर्माण करण्यांत आल्या असून त्या ताबडतोब भरावयाच्या आहेत. तरी लायक उमेदवारांनीं अर्ज त्वरा पाठवावेत. उमेदवार निदान मॅट्रिक परीक्षा पास झालेले व हस्ताक्षर उत्तम असलेले पाहिजेत.

पुणें शहर — द. वि. चितळे,

ता. २५।१०।४५ — मॅनेजिंग डायरेक्टर.

★ पुण्यांतील सर्वांत जुनें व प्रख्यात ★

**पाटसकर यांचें कापडाचें व शिलाईचें दुकान**

१ सरकारी मान्यतेचेः—दि डेक्कन क्लॉथ स्टोअर्स, डेक्कन जिमखाना, पुणें ४.

—: ब्रँचेस :—

२ सरकारी मान्यतेचेः—दि न्यू पूना क्लॉथ स्टोअर्स, पुणें स्टेशनजवळ.

३ पाटसकर आणि कंपनी, बुधवार चौक, ४ पाटसकर आणि कंपनी, कुंटे चौक, हुजूरपागा बिल्डिंग.

या सर्व दुकानांमधून कोटिंग, शर्टिंग, त्याचप्रमाणें लुगडीं, खण, पातळें वगैरे सर्व प्रकारचें कापड मिळतें आणि शिलाई काम केलें जातें.

# यशाची गुरुकिल्ली

कोणत्याहि धंद्यांत यशस्वी होण्यासाठीं सतत व दीर्घकालपर्यन्त शारीरिक व मानसिक श्रम भरपूर करणें भागच असतें. असे श्रम करण्याला शरीर व मन निरोगी व कार्यक्षम ठेवलीं पाहिजेत. हिंदुस्थानसारख्या अतिशय उष्ण व लवकर थकवा आणणाऱ्या हवेंत प्रकृति नेहेमीं निरोगी, बुद्धि तीक्ष्ण, मेंदू शांत व तरतरीत राखण्याचा अनुभविक उपाय

## पर्ल काढा

असा पुष्कळ धंदेवाइकांचा अनुभव आहे. शीतल, शक्तिवर्धक, शारीरिक व मानसिक आरोग्यदायक पर्लकाढा सर्व केमिस्टकडे मिळतो.

आपण वापरूनच खात्री करा.

—आनंदाचा—

# विमा उतरा!

दिवाळीचा आनंद दिवाळीबरोबरच संपून जातो हा नेहमींचा अनुभव आहे. तो आनंद पुढें टिकवितां येईल काय? दिवाळीच्या आनंदाचा संस्कार चित्तावर स्थिर राहावा, आणि त्याचा आस्वाद जीवनांत पुढें वेळोवेळीं घेण्यांत यावा असें वाटत असेल तर या दिवाळींत आमची पॉलिसी घ्या. यामुळें एक प्रकारें दिवाळीच्या आनंदाचाच विमा उतरल्यासारखें होणार आहे.

—विशेष माहितीसाठीं भेटा अथवा लिहा—

पुणें शाखा : १७९ बुधवार लक्ष्मीरस्ता, पुणें २.

मॅनेजर वेस्टर्न इंडिया आयुर्विमा कं. लि. सातारा

दिवाळीकरितां खास पेढे वापरा

# तुळजाराम मोदी

मोतीचौक सातारा

आमचे ग्राहकांस नवीन वर्ष आनंदाचें जावो.

कुटुंबासह मुंबईस आल्यानंतर प्रथम चौकशी करा.

# माधवाश्रम

रेल्वे, ट्राम व चौपाटीपासून अगदींच नजीक.

माधवाश्रम बिल्डिंग ★ गिरगांव, मुंबई.

## कायद्याचे निवडक निवाडे

लेखकः—श्री. सदाशिव वामन दातार, बी. एससी., एलएल. बी.

### (१) जोड नांवावरील ठेवी

एखाद्या हिंदु गृहस्थानें आपल्या व आपल्या बायकोच्या नांवावर रकमा ठेवल्या व अशी व्यवस्था मान्य करून ठेविली कीं, त्यांच्यापैकीं कोणाहि एकाचे पश्चात् मागें हयात असलेल्या व्यक्तीस सदर रकमा याव्या तर सदर गृहस्थाचे मरणोत्तर या रकमा त्याच्या बायकोस देणगी (Gift) या स्वरूपांत मिळतात काय? असा प्रश्न प्रिव्ही कौन्सिलपुढील शंभूनाथ शिवपुरी विरुद्ध पुष्करनाथ वगैरे इसम या दाव्यांत उपस्थित झाला होता. न्यायमूर्तींचा निर्णय असा दिला गेला कीं, देणगी या स्वरूपांत अशा रकमा मयताचे पत्नीस मिळत नाहींत. या रकमांना मयताचे हितसंबंधांचा ट्रस्ट ( Resulting Trust in favour of the Deceased ) असें स्वरूप येतें. पत्नीस या रकमा कायम देणगीच्या स्वरूपांत मिळण्यासाठी अधिक निःसंदिग्ध आदेश दिले जाणें आवश्यक आहेत. हिंदूंच्या बाबतींत संयुक्त नांवावरील सर्वच मिळकतींना हा नियम लागू आहे. मग ज्या व्यक्तींच्या संयुक्त नांवावर सदर मिळकती असतील त्यांच्यांतील नातें पतिपत्नींचें असो, वा पितापुत्रांचें असो, अथवा इतर अन्य कोणतेंहि असो.

### (२) डिबेंचर्सची दुहेरी नोंदणी

एखाद्या कंपनीच्या स्थावर मिळकतीच्या तारणावरील डिबेंचर्स कंपनी-कायद्याप्रमाणें नोंदविलीं असतां त्याशिवाय भरीला तीं रजिस्ट्रेशनच्या कायद्याखालींहि नोंदणें आवश्यक असतें काय? असा प्रश्न के. रॉय अॅन्ड ब्रदर्स विरुद्ध रामनाथ दास या कलकत्ता हायकोर्टांतील दाव्यांत निघाला होता.

दि ईस्ट बेंगाल शुगर मिल्स लि. या कंपनीच्या साखर कारखान्याचे बांधकामाचे मक्ते के. रॉय ब्रदर्स यांनीं घेतले होते. त्याचे पैसे त्यांस दिले न गेल्याकारणानें त्यांनीं एक लवादनिवाडा करून घेतला. पुढें कंपनीनें डिबेंचर्स काढून परदेशांतून यंत्रसामुग्री आणली. हीं डिबेंचर्स कंपनी कायद्याप्रमाणें नोंदविण्यांत आलीं होतीं, परंतु नोंदणी कायद्याप्रमाणें मात्र नोंदविलीं नव्हतीं. पुढें कंपनीचें काम संपुष्टांत ( Liquidation ) आलें. परंतु डिबेंचर्स होल्डर्सनीं आपला रिसीव्हरहि नेमिला नाहीं आणि कंपनीची मिळकतहि ताब्यांत घेतली नाहीं. त्या मिळकतीचा ताबा लिक्विडेटरनें घेतला व स्थावर-जंगम मिळकत दुसऱ्या एका कंपनीस विकून टाकली.

कंपनीचे डिबेंचर्स होल्डर्स जमा झालेल्या पैशावर प्रथम हक्क सांगूं लागले. परंतु 'डिबेंचर्स नोंदणी कायद्याप्रमाणें नोंदविलेलीं नाहींत' ह्या मुद्यावर लिक्विडेटरनें त्यांचा हक्क अमान्य केला.

खालच्या कोर्टांत डिबेंचर्स-होल्डर्सचे बाजूनें निर्णय दिला गेला तेव्हां हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलें. हायकोर्टानें डिबेंचर्स दोन्ही कायद्यांप्रमाणें नोंदविलीं जाणें आवश्यक आहेत असा निर्णय दिला.

### (३) कंपनी कायद्याखालील निर्णय व कोर्ट-फी

कंपनी कायद्याखाली जे निर्णय दिले जातात व ज्यांचेवरून कांहीं रकमा वसूल करण्याचे अधिकार प्राप्त होतात ते निकाल मागण्यासाठी करावयाचे अर्जांना कंपनी कायद्याप्रमाणें ठराविक फी भरावी कीं कोर्ट फीचे कायद्याप्रमाणें मागणी रकमेच्या आंकड्याप्रमाणें कमीअधिक ( Advalorem ) फी भरावी असा प्रश्न लाहोर हायकोर्टापुढील ऑफिशियल लिक्विडेटर, युनिव्हर्सल बँक विरुद्ध कुरेशी या प्रकरणांत निघाला होता.

युनिव्हर्सल बँक संपुष्टांत आल्यावर नेमल्या गेलेल्या ऑफिशिअल लिक्विडेटरनें कॉन्ट्रीब्यूटर्सची याद तयार करून ती मान्य करण्याचा अर्ज कोर्टाकडे ५ रुपयांच्या कोर्ट फीचें तिकीट लावून सादर केला. ती याद कोर्टानें मान्य केली व तींत श्री. कुरेशी यांचें नांव होतें. श्री. कुरेशी यांनीं याद दुरुस्त करून आपलें नांव यादींतून काढण्याचा हुकूम झाला व त्यांना २५० रुपये नुकसानभरपाई मिळाली. परंतु खालच्या कोर्टाच्या या निर्णयावर ऑफिशियल लिक्विडेटरकडून अपील करण्यांत आलें. त्यालाहि ५ रुपयांचें तिकीट लावण्यांत आलें होतें.


श्री. कुरेशी यांचे बाजूनें असा प्राथमिक मुद्दा उपस्थित करण्यांत आला होता कीं, श्री. कुरेशी यांचेविरुद्ध मागण्यांत यावयाची रकम २७०० रुपयांची आहे. जर अपिलाचा निकाल श्री. कुरेशी यांचेविरुद्ध लागेल तर त्यांचेविरुद्ध एवढ्या रकमेचा हुकूमनामा होईल. तेव्हां जेवढ्या रकमेची मागणी असेल तेवढ्या रकमेवरून ठरेल ती फी कोर्ट-फी कायद्याप्रमाणें भरल्याशिवाय अपील चालणार नाहीं.

हायकोर्टानें श्री. कुरेशी यांचें म्हणणें अमान्य केलें व कंपनी कायद्याप्रमाणें देण्यांत येणाऱ्या अशा निर्णयांना जरी दिवाणी कोर्टाच्या हुकूमनाम्याचें स्वरूप असलें व त्या हुकूमनाम्याची बजावणी जरी दिवाणी कोर्टाकडून होत असली तरी असे निर्णय कंपनी कायद्यांतील खास तरतुदी ( Special Provisions ) प्रमाणें दिले जातात तेव्हां त्या तरतुदीसाठी सदर कायद्यानें जी व्यवस्था ठरविली असेल तीच स्वीकारली गेली पाहिजे. कोर्ट फीचा फायदा त्यांना लागू नाहीं. असा निःसंदिग्ध निर्णय कोर्टानें दिला.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

विनचूकच्या माहितीनें
मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो
प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, नं. २७ मुंबई.

पैसा आणि ज्ञान वाढवा !
श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक! किं. १ रु.
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.



# दि बँक ऑफ सिटिझन्स लि० बेळगांव.

( स्थापना : १९३७ )

★ मजबुती, शहाजोगपणा आणि सेवा ह्यांबाबत ★

## ८ वर्षांची उत्कृष्ट प्रगति

—जून अखेरच्या प्रगतीचा आढावा—

—आंकडे—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | २,४१,७०० रु. | |
| खेळतें भांडवल | ३७,००,००० रु. | पेक्षां अधिक |
| ठेवी | ३१,६१,२०१ रु. | |
| निवळ नफा | ३५,६१३ रु. | |
| ( ३०-६-४५ ) | | |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

**मुख्य कचेरीः-१५१४, मारुतीगल्ली, बेळगांव**

शाखाः— अळणांवर बैलहोंगळ चिक्कोडी
धारवाड हल्ल्याळ हुबळी
खानापूर नंदगड निपाणी

**जी. डी. सराफ,**
मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर.

—स्थापना १९१८—

हेड ऑफिसः—सोलापूर

—: शाखा :—

कुर्डुवाडी, पंढरपूर, करमाळा, मोहोळ सेल शॉप

—चेअरमन, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. एच. व्ही. केळकर, बी. ए., एलएल. बी., वकील, सोलापूर

—भांडवल—

| | | |
|---|---|---|
| *अधिकृत भांडवल* ... ... | रु. | *१,५०,०००* |
| *वसूल झालेलें भांडवल* ... ... | रु. | *१,३४,०००* |
| *रिझर्व्ह व इतर फंडस* ... ... | रु. | *१,४४,०००* |
| *एकूण खेळतें भांडवल* ... ... | रु. | *१३,००,०००* |
| *सन १९४४-४५ चा नफा* ... ... | रु. | *१८,४५६* |

मंजूर झालेलें डिव्हिडंड चार टक्के

हेड ऑफिसांत व शाखा ऑफिसांत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करण्यांत येतात. ठेवींचे दराबाबत व नियमाबाबत समक्ष ऑफिसांत चौकशी करावी अथवा अर्ज करून नियम मागवावेत.

सी. एस. परांजपे
मॅनेजर



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें शहर

शाखा—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर-रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक ).

*चेअरमनः—श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B.*

*व्हाइस चेअरमनः—श्री. वी. वी. साळवेकर, M. L. A.*

## एकूण खेळतें भांडवल रु. ३५ लाखांचेवर

—: व्याजाचे दर :—

करंट ½ टक्का, सेव्हिंग्ज २ टक्के, सेव्हिंग्ज (स्त्री खातेदार) २½ टक्के.
कायम ठेवी २½ ते ४½ टक्केपर्यंत ( मुदत ६ महिने ते ५ वर्षे )

शेअर विक्री चालू आहे.

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअरवर ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें.
- सेव्हिंग्ज खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात.
- शॉर्ट टर्म डिपॉझिट्स् स्वीकारलीं जातात.
- मुंबई, नगर, नाशिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्ट्स् दिले जातात.

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
नी. ना क्षीरसागर,
मॅनेजिंग डायरेक्टर्स.



नगर जिल्ह्याची सर्वांत जुनी सहकारी बँक म्हणजेच

# दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर

स्थापना सन १९१०

हेड ऑफिसः—नगर शहर

—शाखा—

१ संगमनेर ( जि. नगर ), २ भिंगार ( ता. नगर )

भांडवल

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व काढलेलें भांडवल... | रु. | २,००,००० |
| भरलेलें भांडवल ... | रु. | १,५६,४१० |
| खेळतें भांडवल ... | रु. | ४३,६२,०७५ |
| चालू ठेवी ... | रु. | २७,८२,३०० |
| मुदत ठेवी ... | रु. | ६,३४,६०० |
| सेव्हिंग्ज ठेवी ... | रु. | ४,४९,४८७ |
| रिझर्व्ह फंड ... | रु. | १,७१,१०८ |
| इतर फंड ... | रु. | १,५४,४७० |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज, चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जें दिली जातात. तसेंच चेक, हुंडी वगैरेचा सर्व व्यवहार केला जातो.

जास्त माहितीकरतां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांकडे लिहा.

नगर, व्यं. श्री. चिंचोरकर
तारीख २३-१०-४५ चेअरमन

यकृत ( Liver ) विकारांवर अप्रतिम गुणकारी

नगरचें **लिव्हरटोन** वापरा

तयार करणार—दि नगर फार्मास्युटिकल वर्क्स लि., अहमदनगर.

**दि नेपच्यून अॅशुअरन्स कं. लि., मुंबई**

आयुष्य, आग व मोटार ह्यांच्या विम्याचें काम करणाऱ्या ह्या जुन्या व प्रमुख कंपनींतच विमा उतरा.

—:विश्वासू एजंट पाहिजेत:—

| | |
|---|---|
| पु. ग. मराठे | ना. स. मराठे |
| चीफ एजंट, | मॅनेजर, |
| महाराष्ट्र ब्रँच | महाराष्ट्र ब्रँच |

न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें.

[ कृषि आणि दुग्धव्यवसायामध्यें अपूर्व क्रांति ]

**डेक्कन अॅग्रिकल्चर अँड डेअरी फार्मिंग लिमिटेड, पुणें**

( इंडियन कंपनीज अॅक्ट १९१३ अन्वयें नोंदलेली )

कंपनीचीं वैशिष्ट्यें:—

(१) दुग्ध आणि तज्जन्य पदार्थांचा माफक भावांत भरपूर पुरवठा करणें.

(२) भाजीपाल्यांची आणि फळांची मोठ्या प्रमाणावर लागवड करून त्यांचा कंपनीचे आश्रयदात्यांस अत्यंत माफक भावांत दुधाच्या रतीबाप्रमाणें घरपोंच पुरवठा करणें.

(३) अव्वल जातींच्या दुभाळ आणि शेतीस उपयोगी पडणाऱ्या जनावरांची निपज करणें.

—मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील—

व्याजाचे दर

१ वर्ष : ५ टक्के, २ वर्षे : ५½ टक्के, ३ वर्षे : ६ टक्के.

अधीक माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मॅनेजिंग एजंट्स

( पी. के. अॅन्ड को. )

रा. नरहर गणपतराव पवार, बी. ए., बी. ई.

रा. दिगंबर वामन कुलकर्णी, बी. ए.

पत्ता:—११६ ए, शुक्रवार पेठ, पुणें २. अगर न्यू प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कं. लि., ७६ सरस्वति विलास, लक्ष्मी रोड, पुणें २.

**आरापकर टेलरिंग कॉलेज**

दादर, मुंबई १४.

माहिती मोफत मागवा

**डब्ल्यू. आर. तळवलकर**

लॅमिंग्टन चेंबर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

| फोन | ग्रॅम |
|---|---|
| ३०३६७ ] | [ PUMPENAMEL |

—विक्रेते—

मे. किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी.

मे. ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी.

म्हैसूर ग्लास अॅण्ड इनॅमल वर्क्स लि.

त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि.

बॉम्बे टिन प्रिंटर्स, मुंबई.

ओरिएंटल मेटल अॅण्ड प्रेसिंग वर्क्स, मुंबई.

"प्लॅमेटल" छत्र्या.

श्री

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड

१८० सदाशिव पेठ, पुणें

## संचालक मंडळ

१ श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
पुणें, ( चेअरमन )

२ डॉ. वि. दा. फाटक,
एल. आर. सी. पी., एम. आर. सी. एस., लोणंद

३ दि. ब. नि. चिं. लिमये,
ॲडव्होकेट व सरकारी वकील, सोलापूर

४ डॉ. र. ग. ठकार,
एल. एम. ॲन्ड एस., पुणें २

५ श्री. अण्णाजी पांडुरंग कोंडे देशमुख
जमीनदार व व्यापारी, पुणें २

६ श्री. म. रा. तांबे,
बी.ए., एल.सी.ई., रि. चीफ अकौंटंट, बॉंबे कॉर्पो. दादर

७ श्री. रा. बा. भट,
पुणें ४

८ रा. ब. भा. ल. मोडक,
एम. सी. ई., एम. इन्स्ट. सी. ई.,
आय. एस. ई. ( रि. ), पुणें ४

९ श्रीमंत ग. वि. साळवेकर,
बी. ए., प्रो. सरदारगृह, मुंबई २

१० डॉ. रा. ह. भडकमकर,
एम. ए., एम. डी., पुणें ४

११ चंद्रशेखर गोविंद आगाशे,
पुणें २
( अधिकारपरत्वें )

## युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

## ही दिवाळी सिंडिकेटच्या भागीदारांस व ठेवीदारांस आनंदाची व भरभराटीची जावो.

सी. जी. आगाशे आणि कं.
मॅनेजिंग एजंट्स.

हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.